Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नगरपालिका मतदान सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत राहणार

### निवडणूक यंत्रणा सज्ज, राज्यात १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या मतदानासाठी निवडणूक आयोगाची यंत्रणा सज्ज झाली आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. या निवडणुकांसाठी ईव्हीएम मशीनचा व्यवस्था करण्यात आली असून त्यात १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची उपलब्धता करण्यात आली आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा तर ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. २ डिसेंबरला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असणार आहे. तर मतमोजणी ३ डिसेंबरला सकाळी १० वाजेपासून सुरु होणार आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (**) असे डबल स्टार चिन्ह नमूद करण्यात येणार आहे. त्यामुळे ज्याच्या नावासमोर ते चिन्ह आहे त्याने कुठे मतदान करणार आहोत याची माहिती देणं आवश्यक आहे. अशा मतदाराने एका ठिकाणी मतदानाचा हक्क बजावला तर दुसऱ्या ठिकाणी तशी माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे दोन ठिकाणी त्याला मतदान करता येणार नाही याची खबरदारी निवडणूक आयोगाने यावेळी घेतल्याचं दिसून येतंय.

नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या या निवडणुकांसाठी २८८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २८८ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर ६६ हजार ७७५ इतके अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

**नगरपरिषद/ नगरपंचायतींची जिल्हा संख्या**

अमरावती- १२, अकोला- ६, बुलढाणा- ११, वाशीम- ५, यवतमाळ- ११, अमरावती विभाग एकूण- ४५

## शिंदेसेनेची काँग्रेससोबत युती; सोनिया गांधींसोबत एकनाथ शिंदेंचे झळकले फोटो

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७धाराशिव**



उद्धव ठाकरे यांनी काँग्रेससोबत युती करून बाळासाहेब ठाकरेंचे विचार सोडले, हिंदुत्व सोडले असा आरोप करून ठाकरेंपासून फारकत घेणारे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने चक्क काँग्रेसशी युती केल्याचं समोर आले आहे. राज्यात नगरपरिषद, नगरपंचायतीच्या निवडणुकीचा प्रचार जोरदार रंगत आला आहे. त्यात उमरगा नगरपरिषदेत शिंदेसेना, काँग्रेस, रयत क्रांती संघटना, लहुजी शक्ती सेना यांच्या युतीने अनेकांना आश्चर्यचकीत केले आहे. शिंदेसेनेच्या उमेदवाराच्या प्रचारात काँग्रेसचा झेंडाही फडकवला जात आहे. त्याशिवाय शिंदेसेनेचे आमदार गळ्यात काँग्रेसचे उपरणं घालून घरोघरी प्रचार करतानाही दिसत आहेत.

विशेष म्हणजे शिंदेसेनेने काँग्रेससोबत केलेल्या या युतीवरून उद्धवसेनेच्या नेत्यांनी प्रहार केला आहे. माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी याबाबत ट्विट केले आहे. दानवे म्हणाले की, काँग्रेस नको म्हणून छाती बडवत सूरत गुवाहाटी गोवा असा पळपुटा प्रवास केलात आणि नाकाने वांगे सोलले. आता घ्या. कटप्रमुख एकनाथ शिंदे, सोनिया गांधी, राहुल गांधी एकाच बॅनरवर, ते ही धनुष्यबाण चिन्हासह...थोडक्यात दिल्लीश्वरांच्या भीतीने बाळासाहेबांचे विचार खुंटीला टांगले आहेत. यालाच म्हणतात बुडाखाली अंधार असा टोला दानवे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला आहे.

## ५० खोके हे सत्यच, संतोष बांगरांना एकनाथ शिंदेंनी ५० कोटी दिले

### भाजपा आमदाराचा खळबळनजक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७हिंगोली**



राज्यातील राजकारणात ५० खोके एकदम ओके ही विरोधकांची घोषणा प्रचंड गाजली. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंशी फारकत घेतल्यानंतर बहुतांश आमदार शिंदेंसोबत गेले. या आमदारांना प्रत्येकी ५० कोटी दिल्याचा आरोप ठाकरे गटाकडून वारंवार करण्यात आला. याला आता भाजपा आमदारानेच दुजोरा दिल्याचं दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपा आणि शिंदेसेना यांच्यात कुरघोडी सुरू आहे. त्यात भाजपा आमदार तानाजी मुटकुळे यांनी ५० खोकेची घटना हे सत्य असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे ५० खोके एकदम ओके हे पुन्हा चर्चेत आले आहे.

संतोष बांगर यांनी एकनाथ शिंदेंकडे जाण्यासाठी ५० कोटी घेतले असं विधान भाजपा आमदार तानाजी मुटकुळे यांनी केले होते. त्यावर पत्रकारांनी विचारले असता आमदार मुटकुळे म्हणाले की, मी केलेले विधान गंभीर असले तरी ते खरे आहे. मला इतरांचे माहिती नाही, परंतु संतोष बांगर यांना ५० कोटी मिळाले हे माहिती आहे. आदल्या दिवसापर्यंत ते रस्त्यावर उतरून लोकांना ठाकरेंसोबतच राहण्याचं सांगत होते, परंतु अचानक त्यांना स्वप्न पडलं आणि ते ५० कोटी घेऊन पळाले. एकनाथ शिंदेंच्या माणसाकडून ते पैसे बांगर यांना मिळाले असा खळबळजनक दावा त्यांनी केला आहे.

राज्यात सत्तेत असलेले भाजप आणि शिंदेसेना हिंगोली जिल्ह्यात नगरपालिकेच्या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात उभे आहेत. आतापर्यंत एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोपांनी निवडणुकीत रंगत भरली होती. मात्र अलीकडेच शिंदेसेनेने भाजपाचे दोन उमेदवार फोडून भाजपाला धक्का दिला. हिंगोलीच्या नगराध्यक्षपदाच्या जागेवर भाजपचा दावा सांगितला जात असताना आमदार संतोष बांगर यांनी येथील निवडणुकीत उडी घेऊन शिंदेसेनेच्या वतीने नगराध्यक्षासह नगरसेवकपदासाठी उमेदवार उभे केले. त्यामुळे भाजप आणि शिंदेसेनेत सुरुवातीपासूनच वादाची ठिणगी पडली. दरम्यान, या निवडणुकीच्या निमित्ताने शिंदेसेनेचे आमदार संतोष बांगर आणि भाजपा आमदार तानाजी मुटकुळे यांच्यात अनेक वेळा आरोप-प्रत्यारोप झाले. मित्रपक्षाच्या विरोधातच शड्डू ठोकला आहे. ही अशी परिस्थिती जवळपास सगळ्याच पालिकेत आहे. पालिकेची सत्ता ताब्यात घेण्यासाठी चढाओढ सुरू आहे. त्यात तानाजी मुटकुळे यांच्या आरोपामुळे शिंदेसेनेवर विरोधकांनी केलेले आरोप सत्य निघाले अशी चर्चा लोकांमध्ये सुरू आहे.

## नगराध्यक्ष पदाचा उमेदवारच म्हणतोय, मला मतदान करू नका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७सातारा**




राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. कराड नगरपालिकेची निवडणूक सुरू आहे. प्रचार सभा जोरदार सुरू आहेत, कराड येथील एका उमेदवाराचा सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये एक उमेदवार लोकांना मला मतदान करु नका असे सांगत असल्याचे दिसत आहे.कराड मध्ये चक्क स्वत: उमेदवार सांगतोय मला मतदान करू नका. उमेदवारी देताना खुल्या वर्गावर राजकीय पक्षांनी केलेला अन्याय व निवडणुकीच्या माध्यमातून अपप्रवृत्तीचा होत असलेला शिरकावा यातूनच अपक्ष उमेदवार ड. श्रीकांत घोडके यांनी पोटतिडकीने निर्णय घेतला आहे. मला मतदान करू नका असे ते प्रचार करत मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत.

दरम्यान, त्यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी या प्रचाराचे कारणही सांगितले आहे. कराड नगरपालिकेत २५ वर्षानंतर नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सर्वसाधारण वर्गासाठी खुले असताना याठिकाणी भाजप व काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षाने नगराध्यक्ष पदासाठी ओबीसी उमेदवार देऊन आम्हा मराठ्यांवर अन्याय केलेला आहे. तसेच निवडणूक प्रक्रियेवर नाराजी व निवडणुकीच्या माध्यमातून अपप्रवृत्तीचा होत असलेला शिरकावा सहन होत नसल्याने हा निर्णय घेतला असल्याचे नगराध्यक्ष पदाचे अपक्ष उमेदवार ड. श्रीकांत घोडके यांनी सांगितले.

कराड पालिका निवडणुकीसाठी १५ प्रभागांतून ३१ नगरसेवक तर थेट जनतेतून १ नगराध्यक्ष निवडला जाणार आहे. तर तब्बल २५ वर्षांनंतर खुल्या प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद आरक्षित झाल्याने निवडणुकीत इच्छुकांची भाऊगर्दी निर्माण झाली आहे.

पालिकेच्या निवडणुकीत भाजप व काँग्रेस स्वबळावर रिंगणात उतरले आहेत तर दोन्ही राष्ट्रवादी व शिंदेसेना यांनी आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जाणे पसंत केले आहे. या सगळ्यांकडेच इच्छुकांची मोठी संख्या होती. पण पक्षाची व आघाडीची उमेदवारी देताना सर्वांचेच समाधान होऊ शकलेले नाही. त्यामुळे अनेक अर्ज अपक्ष म्हणून शिल्लक राहिले आहेत. पण यातील अनेकजण बंडाची भाषा बोलू लागल्याने त्यांना थंड करण्याचे आव्हान नेत्यांसमोर आहे.

## 3BHK फ्लॅट ‘काश्मिरी फळे’ ठेवण्याच्या नावाखाली घेतला अन्..;

### आरोपी डॉ. मुजम्मिल शकील यांच्या कारनाम्यांबद्दल तपासातून धक्कादायक माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नवी दिल्ली**




लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणात अटकेत असलेला मुख्य संशयित आरोपी डॉ. मुजम्मिल शकील यांच्या कारनाम्यांबद्दल तपासातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुज्जम्मिलने खोटी माहिती देऊन माजी सरपंचाचे तीन बेडरुम असलेले घर भाड्याने घेतले होते. काश्मिरी फळे ठेवण्यासाठी घर हवे असल्याचे त्याने सांगितले होते. हे घर बघण्यासाठी तो डॉक्टर शाहीन शाहीदसोबत गेला होता. या घराबरोबरच इतरही स्फोटक माहिती एनआयएच्या हाती लागली आहे.

एनआयएच्या तपासामध्ये अमोनियम नायट्रेटबद्दलही माहिती मिळाली आहे. दहशतवाद्यांनी फतेहपूरमधील तगा आणि धौजमध्ये स्फोटके बनवण्याचे सामान लपवण्याआधी विद्यापीठाजवळच ठेवले होते.जवळपास २५४० किलो स्फोटके अल फलाह विद्यापीठाला लागून असलेल्या शेतात लपवले गेले होते. शेतात बनवलेल्या एका खोलीत हे साहित्य १२ दिवस ठेवले गेले होते. त्यानंतर ते चोरीला जाऊ नये किंवा गावात लोकांना कळू नये, या भीतीमुळे फतेहपूरमधील तगा येथील इश्तियाकच्या जुन्या घरी ते नेण्यात आले. हेच स्फोटके दिल्लीत स्फोट घडवण्यासाठी वापरण्यात आले.

## लाडक्या बहिणींची गर्दी म्हणजे शिवसेनेचा विजय निश्चित, धनुष्यबाणाला मतदान करा : एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ पांढरकवडा**




ज्या वेळी लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने सभेला उपस्थित राहतात त्या वेळी शिवसेनेचा विजय निश्चित असतो. वाशिम-मालेगाव नगरपंचायतीसह कारंजा नगरपरिषदेचा नवीन विकासाचा अध्याय आता लिहिला जाणार आहे. विकासाचे राजकारण नव्हे तर विकासाचे समाजकारण करायचे असून आता थेट ॲक्शन मोडवर काम होईल, असे शिवसेनेचे प्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

पाणीपुरवठा, रस्ते आणि गटार यांसह मूलभूत सुविधांसाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे सांगताना त्यांनी आधीच ६५ कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प दिल्याची आठवण करून दिली. खड्डेमुक्त रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा, कब्रस्तानासाठी जागा, मुलांसाठी उद्यान आणि मैदानाची उभारणी लवकरच करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. महिलांसाठी सुरू असलेली ‘माझी लाडकी बहीण’ योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, महिलांना बचत गटांच्या माध्यमातून खेळते भांडवल देऊन आर्थिक सक्षम करण्याचे काम सुरू राहील, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

## पुढील दोन-तीन दिवसांत काय होईल सांगता येत नाही शरद पवारांच्या विधानानं भुवया उंचावल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ बारामती**



राज्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळं कोट्यवधींचं नुकसान सोसलेल्या शेतकऱ्यांबाबत सरकारनं फक्त कर्जवसुलीला स्थगिती देऊन जबाबदारी संपल्यासारखं करू नये, अशी स्पष्ट व कठोर भूमिका राष्ट्रवादी - शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली.एक वर्षाची स्थगिती तात्पुरती उपयोगी पडेल, पण शेतकऱ्यांचं झालेलं प्रचंड नुकसान भरून निघणार नाही. सरकारनं थेट आर्थिक मदत दिली पाहिजे, असं ते म्हणाले.

शरद पावर हे आज बारामतीत निवासस्थानी माध्यमाशी बोलत होते. काही जिल्ह्यांत अतोनात हानी झाली आहे. काहींची जमीनच वाहून गेली, तर काहींची शेतीची साधनं पूर्णत: नष्ट झाली. अशांना पुन्हा उभं राहण्यासाठी सरकारकडून थेट मदत अपेक्षित होती. व्याजमाफी व हप्ते दिले असते, तर मोठा दिलासा मिळाला असता. आजची मदत अपुरी आहे, असा टोला शरद पवार यांनी सरकारला थेट लगावला.

प्रचारात सुरू असलेल्या स्पर्धेवर भाष्य करताना पवारांनी कोणाचंही नाव न घेता सरकारवर निशाणा साधला. मत मागताना कामाची भाषा नाही, फक्त मी इतके पैसे दिले, मी निधी दिला अशीच स्पर्धा दिसते. अर्थकारणातून निवडणुका जिंकायच्या हा दृष्टिकोन अत्यंत चुकीचा आहे, अशी जोरदार टीका त्यांनी केली.

## संपादकीय ......

# मनसेला काँग्रेसच्या गळी उतरवण्याची पवारांची कसोटी

बराच काळ प्रलंबित राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. मध्ये काही वर्षे या ठिकाणी प्रशासकीय राजवट असल्यामुळे आता राजकीय पक्ष आणि त्यांच्या स्थानिक पातळीवर छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांच्या अंगी मोठा उत्साह संचारलेला आहे. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपला वरचष्मा रहावा यासाठी विशेषत: भाजप आटोकाट प्रयत्न करत आहे. त्यांच्या या प्रयत्नांचे धक्के त्यांच्या सोबत असलेल्या मित्र पक्षांना बसत आहेत. त्यामुळे त्यांच्या नाराजीच्या ठिणग्या उडत आहेत. भाजपने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार खाली खेचण्यासाठी शिवसेनेत नाराज असलेले एकनाथ शिंदे यांना सोबत घेतले. शिंदे यांना अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद दिले, पण जेव्हा पुन्हा २०२४ साली विधानसभेची निवडणूक झाली तेव्हा पुन्हा मुख्यमंत्री होण्यास शिंदे उत्सुक होते, पण शिंदेंना पुन्हा मुख्यमंत्री होण्याची संधी न देता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये आपलीच सत्ता कशी येईल, यासाठी भाजपचे केंद्रीय तसेच राज्य पातळीवरील नेते आटोकाट प्रयत्न करत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्या जाणार्या आर्थिक लाभाच्या योजना हा आता भाजपसाठी हुकमी एक्का ठरत आहे. त्याचा अनुभव त्यांना महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीपूर्वी लाडकी बहीणच्या माध्यमातून आला. लाभार्थी महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये तर बिहारमध्ये व्यवसाय सुरू करण्यासाठी १० हजार रुपये जमा करण्यात आले. याचा भरघोस फायदा यांना मिळाला.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने जाहीर होत आहेत. तसे वातावरण तापत आहे, काही घटना पुढे आणून वातावरण तापवले जात आहे. भाजपकडे केंद्रातील आणि राज्यातील सत्तेची सूत्रे असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जो निधी दिला जातो, त्याच्या किल्ल्या भाजपकडे आहेत. कारण या संस्था वरून येणार्या निधीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. त्यामुळेच या निवडणुकांवर भाजपचा जास्त दबदबा आहे. तसा तो निर्माणही केला जात आहे. त्यासाठी भाजपचे लक्ष्य हे मुस्लीम आणि ठाकरे बंधू आहेत. कारण त्यांना माहीत आहे की, आपण कितीही सुविधा उपलब्ध करून दिल्या तरी मुस्लिमांची मते आपल्याला मिळत नाही. उद्धव ठाकरे, शरद पवार यांचे पक्ष आणि काँग्रेस हे तर भाजपचे विरोधक आहेत. पण भाजपची बाजू लावून धरणारे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना भाजप आपल्यासोबत घेऊ इच्छित नाही, त्यांना फक्त ताटकळत ठेवत आहे, हे लक्षात आल्यावर त्यांनी भाजपपासून अंतर राखायला सुरुवात केली. त्याच वेळी दुसर्या बाजूला उद्धव ठाकरे यांच्या हातून शिवसेना पक्ष आणि चिन्ह काढून घेतल्यामुळे ते कमजोर झालेले आहेत. अशा वेळी दोन्ही भावांची कमजोरीच त्यांच्या एकत्र भेटीगाठीला कारणीभूत ठरू लागली आहे. शिवसेनेतून राज ठाकरे बाहेर पडल्यानंतर कायम त्यांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले. दोन्ही भावांमधून विस्तव जात नव्हता. पण आता दोघांची परिस्थिती नाजूक झाल्यामुळे दोघेही एकाच शेकोटीला बसायला तयार झाले आहेत. हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात दोन्ही भाऊ अनेक वर्षांनंतर एकत्र आले. तिथून त्यांची जवळीक वाढायला सुरुवात झाली आहे, पण उद्धव ठाकरे ज्या महाविकास आघाडीचे घटक आहेत, त्यात काँग्रेस आहे, काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे विशेषत: उत्तर भारतीयांविरोधात आक्रमक असलेले राज ठाकरे महाविकास आघाडीत नकोत, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. इथेच गाडी अडत आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणातील बीग बॉस, महागुरू म्हणून ज्यांची महती आहे, असे शरद पवार महाविकास आघाडीत आहेत, किंबहुना, या आघाडीचे जनक तेच आहेत. महाराष्ट्रात २०१९ साली विधानसभा निवडणूक झाल्यावर उद्धव ठाकरे यांची मुख्यमंत्रीपदाची मागणी भाजपने फेटाळून लावली. त्यावेळी ठाकरेंनी भाजपपासून फारकत घेतली. हीच संधी शरद पवारांनी साधली. त्यांनी उद्धव ठाकरे यांना आपल्या गोटात सामील करून महाविकास आघाडीची स्थापना केली. त्यात काँग्रेसला सहभागी करून घेतले, पण सुरुवातीला काँग्रेस या आघाडीत यायला तयार नव्हती. कारण त्यात शिवसेना होती. काँग्रेसच्या दृष्टीने शिवसेना हा जातीयवादी, प्रांतवादी पक्ष आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत आपण गेलो तर आपले इतर राज्यांमध्ये नुकसान होईल. पण शरद पवारांनी हीच केंद्रातील मोदींना शह द्यायची संधी आहे, हे सोनिया गांधी यांच्या लक्षात आणून दिले. त्यामुळे काँग्रेस महाविकास आघाडीत यायला तयार झाली. आताही तशीच परिस्थिती आलेली आहे. ठाकरे बंधू निवडणुकीत एकत्र येण्याच्या जोरदार हालचाली सुरू आहेत, पण ते एकत्र आले तर उद्धव ठाकरे ज्या महाविकास आघाडीत आहेत, त्यात राज त्यांचा समावेश करून घ्यावा लागेल. पण त्याला काँग्रेसचा विरोध आहे. कारण त्यांच्या आणि आमच्या पक्षाची संस्कृती वेगळी आहे, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. पण राज यांना आघाडीत घेण्याला शरद पवार अनुकूल आहेत. २०१९ साली शिवसेनेचीही संस्कृती वेगळी होती म्हणून काँग्रेसने सुरुवातीला शिवसेनेचा विरोध केला होता. पण मोदी आणि भाजपला शह देण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे, हे पवारांनी लक्षात आणून दिल्यावर काँग्रेस तयार झाली होती. आताही त्यांनी मनसेला आघाडीत सामील करून घेण्यासाठी अशीच शिष्टाई केली आणि ती यशस्वी ठरली तर राज ठाकरे आघाडीत असतील. राज यांच्यासारखा प्रचंड गर्दी खेचणारा प्रभावी वक्ता मिळाला तर आघाडीचे भले होईल, याची पवारांना कल्पना आहे.

# हरभरा पिकासाठी कोणत्या सिंचन पद्धतीने कधी व किती पाणी द्यावे? जाणून घ्या सविस्तर

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक**

हरभरा हे रब्बीतील एक महत्वाचे पीक आहे. ज्याचे उत्पादन भारतात विविध भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्याचबरोबर यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न देखील मिळवता येते.

त्यामुळे योग्य पाणी व्यवस्थापन हरभरा पिकासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते कारण पाण्याची योग्य मात्रा पीकाच्या वाढीवर मोठा प्रभाव टाकते. याचअनुषंगाने आज आपण जाणून घेणार आहोत हरभरा पिकाला पाणी देण्याच्या योग्य वेळा आणि पद्धतीची सविस्तर माहिती.


हरभरा पिकाचे प्रभावी पाणी व्यवस्थापन

हरभरा पिकाला पाणी देण्याच्या वेळा आणि पद्धती

हरभरा पिकास सुरुवातीला उगवणीनंतर पहिले पाणी पीक कळीवर असताना (४० ते ४५ दिवसांनी) देणे गरजेचे असते. त्यानंतर दुसरे पाणी घाटे भरतेवेळी (७० ते ७५ दिवसांनी) देणे आवश्यक आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

कधी कधी, विशेषतः मर्यादित ओलीत असलेल्या जमिनीत, घाटे भरतेवेळीच एक ओलीत देणे पुरेसे असते.

यामध्ये एक महत्त्वाची बाब म्हणजे, दोन ओळी रुंद वरंबा सरी पद्धतीने ओलीत केल्यास इतर पद्धतीच्या तुलनेत ३०% पाणी बचत होते आणि उत्पादनात २०% वाढ होते.

जमिनीनुसार पाणी देण्याची वेळ साधारणपणे २० ते २५ दिवसांच्या अंतरावर ठेवली जाते. मध्यम जमिनीत उगवणीनंतर पहिले पाणी, कळी असताना दुसरे, आणि घाटे भरतेवेळी तिसरे पाणी द्यावे.

हलक्या जमिनीत पिकाची स्थिती पाहून पाणी देणे आवश्यक आहे. याबाबत, जास्त पाणी दिल्यास पिकाचे उभळण्याचा धोका असतो. त्यामुळे, पाणी देण्यास उशीर करू नये आणि पाणी साचू देऊ नये. अन्यथा मुळकुजव्या रोगामुळे पिकाचे नुकसान होऊ शकते.

तुषार सिंचन पद्धती; फायदेशीर व प्रभावी

हरभरा पिकाला पाणी देताना तुषार सिंचन पद्धती अत्यंत फायदेशीर ठरते. ही पद्धत पिकाच्या पाण्याच्या आवश्यकतेला बरोबर प्रतिसाद देते आणि यामुळे पिकाच्या उत्पादनात चांगली वाढ होते.

या पद्धतीमुळे पाणी चांगल्या प्रकारे शेतात पसरते आणि जमिनीचा भुसभुशीतपणा कमी होण्यापासून वाचवते. यामुळे मशागतीचा खर्च कमी होतो परिणामी अधिक उत्पन्न हाती येते.

हरभरा पिकाचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी पाणी व्यवस्थापन अतिशय महत्त्वाचे आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी दिल्यास उत्पादनात मोठी वाढ होऊ शकते.

तुषार सिंचन पद्धती यासाठी सर्वात प्रभावी मानली जाते. शेतकऱ्यांनी या पद्धतीचा अवलंब करून चांगले उत्पादन मिळवू शकतात, तसेच त्यांच्या खर्चातही बचत होऊ शकते.

**– प्रा. संजय बाबासाहेब बडे**
सहाय्यक प्राध्यापक, कृषि विद्या विभाग
दादासाहेब पाटील कृषि महाविद्यालय,
दहेगाव ता. वैजापूर जि. छ. संभाजीनगर.




# जेवणानंतर चिमूटभर बडीशेपही करेल वेटलॉस! खाण्याची योग्य पद्धत पाहा

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक–** बडीशेप चघळल्याने तोंडाचा वास निघून जातो व पचनक्रिया व्यवस्थित राहते. याशिवाय ॲसिडीटी, आंबट ढेकर यासारख्या समस्यांवर मात करण्यासाठी बडीशेप उत्तम आहे. रोजच्या खाण्यात बडीशेप खाल्ल्यास अनेक समस्या दूर होऊ शकतात. आयुर्वेदाचार्य डॉ. सिद्धार्थ सिंह सांगतात की, बडीशेपमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात जे पोटाच्या समस्या दूर करतात.

**चांगला स्वाद आणि चांगले आरोग्यही**

बडीशेप प्रत्येक घरात वापरली जाते जी आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्याची चव सर्वांनाच आवडते. आजींच्या घरगुती उपायांमध्ये बडीशेपच्या सर्व प्रकारच्या फायद्यांचा उल्लेख आहे. चला, जाणून घेऊया त्याचे फायदे–

**बीपी ठेवते कंट्रोल–** जर उच्च रक्तदाबाची तक्रार असेल तर बडीशेप खाण्यास सुरुवात करा. बडीशेप चघळल्याने लाळेतील नायट्रेटची पातळी वाढते. हा नैसर्गिक घटक रक्तदाब पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. याशिवाय बडीशेपमध्ये पोटॅशियम भरपूर असते, जे रक्तदाब आणि हृदयाचे ठोके कंट्रोल करतात.

**त्वचेसाठी फायदेशीर–** बडीशेप पाणी पिण्यापासून ते त्याची पेस्ट चेहऱ्यावर लावण्यापर्यंत अनेक प्रकारे त्याचा वापर करता येतो. बडीशेप ब्लड सर्कुलेशनमध्ये ऑक्सिजन संतुलन निर्माण करून हार्मोन्स संतुलित करते. याने चेहरा थंड राहतो व याने चेहऱ्यावर एक छान ग्लो येतो.

**हृदयासाठी फायदेशीर–** बडीशेपमध्ये भरपूर फायबर, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि कॅल्शियम असते, जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. यामध्ये आढळणारे फायबर कोलेस्ट्रॉल सारख्या हृदयरोगाचा धोका कमी करते.

बडीशेपमध्ये कर्करोगाचे गुणधर्म आढळतात, ज्यामध्ये कर्करोगाशी लढण्याचे गुणधर्म आढळतात. या संशोधनात असेही आढळून आले की, बडीशेप स्तन आणि यकृताच्या कर्करोगातही मदत करते.

**सूज कमी करते–** बडीशेपमध्ये लैक्टोजेनिक गुणधर्म असतात, जे आईचे दूध वाढवण्यास मदत करतात. बडीशेप रक्तातील प्रोलॅक्टिनची पातळी वाढवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. यामुळेच



प्रसूतीनंतर मातांना बडीशेप खाण्याचा सल्ला दिला जातो.

**उपाशी पोटी बडीशेपचे पाणी पिणे आहे फायदेशीर–** जर तुम्हाला शरीर डिटॉक्स करायचे असेल तर बडीशेपचे पाणी उपाशी पोटी प्या. यामुळे चरबी जमा होणार नाही. बडीशेपचे पाणी उपाशी पोटी प्यायल्याने त्वचेच्या अनेक समस्या दूर होतात. त्यात पोटॅशियम असते ज्यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होतो. बडीशेपचे पाणी पचनाच्या समस्या दूर करण्यासाठी खूप प्रभावी आहे.

**वजन कमी करण्यासाठी बडीशेप फायदेशीर–** आहारात बडीशेप वापरल्याने जास्त वेळ भूक लागत नाही. याचे योग्य प्रमाणात सेवन केल्यास वजन कमी होते. एक चमचा बडीशेप रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी प्या आणि दाणे चघळून खा. आपण स्वयंपाक करताना मसूर किंवा भाज्यांमध्ये मसाला म्हणून वापरू शकता. हे पावडर म्हणून देखील वापरले जाऊ शकते. यामुळे पचनक्रिया बरोबर राहते. बडीशेपच्या बिया दिवसातून २-३ वेळा चघळल्याने तोंडाच्या दुर्गंधीपासून आराम मिळतो.

# महापालिकांच्या मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

## हरकतींसाठी ३ डिसेंबरपर्यंत मुदत, अंतिम यादी १० डिसेंबरला होणार प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मुंबई–** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्व राजकीय पक्षांचे आणि जनतेचे लक्ष लागले असतानाच, राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी (२०२५) मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून, सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यानुसार आता प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी ३ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून मतदार यादीचा नवीन कार्यक्रम कळवला आहे. यापूर्वी २७ नोव्हेंबर ही हरकती घेण्याची अंतिम तारीख होती, ती आता वाढवण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार कार्यक्रम खालीलप्रमाणे असेल:

हरकती व सूचना : प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आता ३ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल. (पूर्वीची तारीख: २७ नोव्हेंबर).

**अंतिम मतदार यादी :** हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रमाणित करून प्रसिद्ध करण्याची तारीख आता १० डिसेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे.




(पूर्वीची तारीख: ५ डिसेंबर).

मतदान केंद्रे : मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल. (पूर्वीची तारीख: ८ डिसेंबर).

**केंद्रनिहाय यादी** : मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख २२ डिसेंबर २०२५ असेल. (पूर्वीची तारीख: १२ डिसेंबर).

तांत्रिक अडचणींसाठी हेल्पलाईन

मतदार यादी तयार करताना प्रशासकीय पातळीवर कोणत्याही तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी आयोगाने खबरदारी घेतली आहे. काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास ई-मेलद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, अत्यंत महत्त्वाच्या कारणासाठी आयोगाच्या संगणकीकरण कक्षाचे अधिकारी समीर गंदपवार यांच्याशी (०२२-२२८८६९५० / २२०१२२९० ) संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

निवडणुकीची तयारी वेगवान गेल्या काही वर्षांपासून राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. मात्र, निवडणूक आयोगाच्या या पत्रामुळे प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. आयोगाच्या ारहरीशल.ारहरीरीहीर.सीं.ळप या संकेतस्थळावर हा संपूर्ण कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आला आहे.

नागरिकांना आपली नावे तपासण्यासाठी आणि काही दुरुस्ती असल्यास ती करण्यासाठी ही वाढीव मुदत महत्त्वाची ठरणार आहे. १० डिसेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होईल, असे मानले जात आहे. या सुधारित कार्यक्रमामुळे प्रशासकीय यंत्रणेवरील ताण काहीसा हलका झाला असला तरी, कामाचा वेग वाढवण्याचे आव्हान अधिकाऱ्यांसमोर असणार आहे.

# वाळू तस्करी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना, तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७मुंबई–** राज्यातील वाळू तस्करी रोखण्यासाठी राज्य सरकारने कठोर उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार आता वाळू तस्करी करणारे वाहन पहिल्यांदा पकडले गेल्यास परवाना ३० दिवस निलंबित ठेवून वाहन अडकवून ठेवले जाईल. दुसऱ्या गुन्ह्यात ६० दिवस परवाना निलंबित करून वाहन अडकवून ठेवण्यात येईल. तर तिसरा गुन्हा झाल्यास संबंधित वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. महसूल विभागाने आज (२६ नोव्हेंबर) याबाबतचे शासन परिपत्रक जारी केले आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू आणि इतर गौण खनिजांच्या चोरीमुळे सरकारी महसुलाची आणि पर्यावरणाची मोठी हानी होते. याशिवाय अवैध व्यवसायातून गुन्हेगारी वाढत असून कारवाईसाठी जाणाऱ्या सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या दिलेल्या निर्देशानुसार अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी परिवहन विभागाच्या मदतीने आता कडक धोरण अवलंबण्यात आले आहे.



वाहनांवर करडी नजर

अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीसाठी वापरले जाणारे ड्रील मशीन, जेसीबी, पोकलैंड, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली, हाफ बॉडी ट्रक, फुल बॉडी ट्रक, डंपर, ट्रॉलर, कॉम्प्रेसर, ट्रॉलर, बार्ज, मोटोराईज्ड बोट, एक्सकॅवेटर, मॅकेनाईज्ड लोडर यासारख्या सर्व प्रकारच्या वाहनांवर आणि साहित्यावरही करडी नजर ठेवण्यात येणार आहे.

अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती परिवहन विभागाला कळवावी

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शासनाचा महसूल चूकविणे हा गंभीर गुन्हा आहे, मात्र तरीही काही लोक जाणीवपूर्वक असा प्रयत्न करतात. त्यांना वचक बसावा यासाठी हा निर्णय घेतला आहे. यामुळे महसूल विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेने अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती तत्काळ परिवहन विभागाला कळवावी. जेणेकरून संबंधित वाहनांवर जागेवरच कारवाई करणे शक्य होईल.

# कुष्ठरुग्ण शोध मोहीम २०२५-२६ अंतर्गत नवोदय विद्यालयात जनजागृती रॅलीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती,**

अमरावती महानगर पालिका कार्यक्षेत्रातील शहरी आरोग्य केंद्र, महेंद्र कॉलनी यांच्या वतीने नवोदय विद्यालय परिसरात कुष्ठरुग्ण शोध मोहीम २०२५-२६ निमित्त भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून मान्यवरांनी मोहिमेचा शुभारंभ केला. उपस्थित मान्यवरांमध्ये अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथकातील वैद्यकीय अधिकारी डॉ. विनंती नवरे, नवोदय विद्यालयाच्या प्राचार्या आर. एस. चंदनशिव, स्टाफ नर्स अंजली नासरे तसेच शहरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आकीब अहमद यांचा समावेश होता.प्राचार्य श्री चंदनशिव यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. विनंती नवरे यांनी कुष्ठरोग, त्याची



लक्षणे तसेच कुष्ठरुग्ण शोध मोहिमेची उद्दिष्टे व महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी विद्यार्थी, शिक्षक व अधिकारीवर्गाला कुष्ठरोगाविषयी जागरूक राहण्याचे आणि संशयित लक्षणे आढळल्यास त्वरित सरकारी आरोग्य केंद्रात तपासणी करण्याचे आवाहन केले.अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी समाजातील कुष्ठरोगाविषयी असलेल्या अंधश्रद्धा व गैरसमज दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे तसेच मोहिमेला मोठ्या प्रमाणात जनसहभाग मिळविण्याचे आवाहन केले.अवैद्यकीय पर्यवेक्षक गजानन पन्हाळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. त्यानंतर मान्यवर, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी नवसारी परिसरात रॅली काढून कुष्ठरोग जनजागृती केली.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अवैद्यकीय सहाय्यक जोसेफ पीटर, आरोग्य सेविका वैशाली सुरोशे, आरोग्य सेवक मनीष हटवार, उमेश जाधव, आशा स्वयंसेविका संध्या पाटील, सुधा खडसे, शैला गावंडे, प्रांगली मोहोळ आणि उषा वानखडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# तीन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका धोक्यात

## आरक्षण मर्यादा वाढीचा मुद्दा पुन्हा पेटला

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२७अमरावती–**

मतदारसंघांचे आरक्षण निश्चित करताना एकूण आरक्षण ५० टक्यांहून अधिक असू नये, असा कायदा आहे. सर्वो च्च न्यायालयानेही तसेच निर्देश दिले आहेत. परंतु तरीही प्रभागांचे आरक्षण निश्चित करताना काटेकोर काळजी न बाळगल्याने जिल्ह्यातील चिखलदरा व दर्यापुर या दोन नगरपालिका आणि धारणी या नगरपंचायतीमध्ये एकूण आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक झाले आहे. त्यामुळे तेथील निवडणुकांवर अनिश्चिततेचे सावट आहे.

यासंदर्भात मंगळवार २५ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी होणार होती. सुनावणी पुन्हा एकदा दोन दिवस पुढे ढकलण्यात आली असून २७ नोव्हेंबर ही नवी तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे या तिन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे भवितव्य टांगणीला लागले असून मतदानापूर्वीच तेथील निवडणूक रद्द होणार की निकाल रोखून धरायला लावले जाणार, याबद्दल विधीतज्ज्ञांद्वारे वेगवेगळे तर्क व्यक्त केले जात आहेत. काहींच्या मते सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या निकालाच्या अधीन राहून या तिन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला अभय मिळू शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोणते प्रभाग कोणत्या संवर्गासाठी आरक्षित केले जावे, यासाठी प्रत्येक नगर पालिका व नगरपंचायती साठी प्राधिकृतअधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या देखरेखीत आणि पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह सामान्य नागरिकांच्या उपस्थितीत ठिकठिकाणी सोडत काढण्यात आली. जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायती अशा डझनभर ठिकाणी एकाच दिवशी ही सोडत काढण्यात आली. परंतु तरीही चिखलदरा येथील एकूण आरक्षण ७५ टक्क्यांवर पोहोचले असून दर्यापुर नगरपालिकेचे एकूण आरक्षण ५२ टक्के आहे. त्याचवेळी धारणी नगरपंचायतीचे आरक्षण ६५ टक्के झाले असून तिन्ही ठिकाणची संख्या ही ५० टक्क्यांहून अधिक असल्याने तेथील निवडणूकीची स्थिती डामाडौल आहे.




### जिल्हा परिषदेबाबतही अडचण

जिल्ह्यातील १२ पैकी दोन नगरपालिका आणि एका नगरपंचायतीबद्दल ही अडचण असतानाच जिल्हा परिषदेतही तसेच झाले आहे. जिल्हा परिषदेतील वेगवेगळ्या संवर्गांचे आरक्षण ६४ टक्क्यांवर पोहोचले आहे. ही संख्या ५० टक्क्यांहून अधिक असल्याने ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण असू नये, या कायद्याचा तेथेही भंग झाला आहे. त्यामुळे येत्या काळात जिल्हा परिषदेच्या निवडणुकांबाबतही अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे उद्या २७ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालय काय सांगते, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे

# बोटावर शाई लावण्यासाठी लागणारे ४७०० विशेष शाई मार्कर जिल्ह्यात दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

जिल्हा परिषद वपंचायत समिती निवडणुकी संदर्भात शासनव न्यायालयाकडून अद्याप स्पष्ट आदेश नसलेतरी जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. मतदार यादीचे अद्ययावतीकरण, मतदान केंद्रांची पाहणी, मनुष्यबळाची रूपरेषा आदी कामांसोबतच मतदान प्रक्रियेत बोटावर शाई लावण्यासाठी लागणारे ४७०० विशेष शाई मार्कर जिल्ह्यात दाखल झाले आहेत. केवळ निवडणुकीच्या घोषणेची प्रतिक्षा प्रशासनाला लागली आहे.




शाई ऐवजी बोटाला मार्करने खुन केली जाणार आहे. मार्करची गुणवत्ता व सुरक्षा तपासून ते तालुकास्तरावर वितरीत करण्याकरिता जिल्हा प्रशासन सज्ज आहे. मतदानाच्या दिवशी मतदाराची ओळख निश्चित करण्यासाठी शाईचा वापर केला जातो. एकदा लावलेली शाई काही दिवस न पुसता टिकते, त्यामुळे मतदान प्रक्रियेची पारदर्शकता व विश्वासार्हता वाढते. यामध्ये आता शाई ऐवजी मार्कर वापल्या जाणार आहे. त्यामुळे जिल्हास्तरावर सद्या ४ हजार ७०० मार्कर प्राप्त झाले आहे. मात्र निवडणुकीबाबत सांशका असल्याने प्रशासनाने आधीच तयारी पुर्ण केलेली आहे. अद्याप निवडणुकीची अधिकृत घोषणा न झाल्याने जनतेमध्ये उत्सुकता कायम आहे. मात्र, मतदार यादीपासून साहित्य साठवणूकपर्यंत सर्व बाबींमध्ये प्रशासनाने केलेली तयारी पाहता, निवडणुक लागताच प्रशासनाकडून तातडीने याची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यामुळे आता गरुवार आणि शुक्रवारी न्यायालयीन सुनावणीत काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### १९ लाख ३९ हजार ८९७ मतदारांची यादी तयार

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमिवरजिल्हा प्रशासनाकडून मतदार यादी तयार करण्यात आली आहे. यामध्ये १५ लाख ३५ हजार ८९७ मतदारांचा समावेश आहे. तालुकास्तर व बूथ निहाय यादी तयार आहे. मात्र एक महिन्यांपासून मतदार यादीच्या अंमित प्रसिद्धीला मुदतवाढ मिळत आहे. आता गुरुवारी ही यादी अंतिम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.–

### फेब्रुवारीपर्यंतच मार्करची एक्प्रायरी डेट

बोटाला शाई लावण्याकरिता वापरातयेणारा मार्कर १० नोव्हेंबर २०२५ ला तयार करण्यात आला असून याची मुदत तीन महिने म्हणजे ८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत देण्यात आली आहे. त्यामुळे त्या आधी निवडणुका न लागल्यास मार्करची एक्सप्रायरी संपणार आहे.

# नगरपालिकांच्या निवडणुकीनिमित्त जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटी

## स्ट्राँग रूमची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

येत्या दोन डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी चांदूरबाजार येथे भेट दिली. दरम्यान त्यांनी नगरपालिकेच्या शाळांना भेट दिली. नगर परिषद चांदूर बाजार सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मतदानाच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सोनल सूर्यवंशी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी गीता ठाकरे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार मनोज सोनारकर, श्री. गवई, यश अग्रवाल, श्री. थोरात आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी चांदूरबाजार येथील स्ट्राँग रूमची पाहणी केली. त्यानंतर नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांना साहित्य वाटप होणाऱ्या ठिकाणची पाहणी केली. दरम्यान श्री. येरेकर यांनी नगर परिषद विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाला भेट दिली. विद्यालयातील खोली क्र. १ मधील मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी सहावीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याच शाळेत सुरू असलेल्या विज्ञान प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.




# आरक्षणावर नो ऑब्जेक्शन; असंतोषाची कुजबुज कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** महानगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रभागनिहाय नुकतेच घोषित करण्यात आले. या आरक्षणासंदर्भात २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सुचना मागवण्यात आल्या होत्या. परंतु, शेवटच्या मुदतीपर्यंत केवळ दोनच आक्षेप आले. तेही फारसे प्रभावी नसल्यामुळे त्यावर सुनावणी झाली की, आरक्षण अंतिम करण्यासाठी ते राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवले जाणार आहे.आश्चर्याची बाब म्हणजे आरक्षण घोषित झाल्यानंतर बहुतेक सर्वच प्रभागातून त्याबाबत प्रस्थापित उमेदवारांमध्ये नाराजीचे सूर उमटले होते. अनेकांना आता प्रभाग बदलावा

लागणार, अशीही जोरदार चर्चा होती. कारण, प्रत्येक प्रभागामध्ये महिलांसाठी दोन जागा असल्यामुळे पुरुष उमेदवारांना तेथे आपला जम बसवणे कठिण होणार होते. अशात केवळ दोन आक्षेप आल्यामुळे आरक्षणाबाबत केवळ फुसकी ओरड होती. प्रत्यक्षात कोणाचेही गणित बिघडणार नव्हते, हेच यावरून स्पष्ट झाले आहे. तसेच सध्या प्रारूप मतदारयादीतील घोळाबाबत सर्वत्र आरडाओरड सुरू आहे. त्यामुळे कदाचित आरक्षणाकडे कोणाचेही लक्ष गेले नसावे, असा अंदाजही राजकीय वर्तुळात वर्तवला जात आहे.

काहीही असले तरी आरक्षणाबाबत केवळ दोन आक्षेप हा देखील सध्या चर्चेचा विषय होत आहे.



# काँग्रेस पदाधिकारी म्हणतात ...नाही तर आम्ही भिंत तोडू

## रेल्वे पूल चार महिन्यांपासून बंदच,सात दिवसांचा दिली मुदत

### शहरवासी वाहतूक कोंडीने त्रस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावतीच्या राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन मार्गावरील रेल्वे ओव्हरब्रिज चार महिन्यांपासून बंदिस्त असल्यामुळे मुख्य शहराची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. परिणामी नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, असे सांगत अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तत्काळ कार्यवाहीची मागणी केली आहे. शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग आणि महानगरपालिका यांनी सात दिवसांत स्पष्ट भूमिका न केल्यास 'भिंत तोड जनआंदोलन' करण्याचा इशाराही काँग्रेसने दिला आहे.

अमरावतीचा रेल्वे ओव्हरब्रिज ऑगस्ट २०२५ पासून पूर्णपणे बंद आहे. हा मार्ग शहराच्या मध्यवर्ती भागांना जोडणारा असल्याने जयस्तंभचौक, इर्विन चौक, सरोज चौक, चित्रा चौक या प्रमुख चौकांमध्ये दररोज तीव्र वाहतूक कोंडी होत आहे. विद्यार्थ्यांना, शासकीय व खासगी कर्मचाऱ्यांना, व्यापाऱ्यांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विद्यार्थ्यांना नेहमीच्या १५मिनिटांच्या प्रवासाऐवजी १ ते १.५ तासांचा विलंब होत आहे, तर कार्यालयीन कर्मचारी वेळेवर पोहोचू शकत नाहीत. पुलाजवळील व्यापाऱ्यांचाव्यापारही ठप्प झाल्याची तक्रार निवेदनात करण्यात आली आहे.पुल बंद असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग, पोलिस वाहतूक शाखा आणि महानगरपालिका यांनी आजपर्यंत एकही संयुक्त बैठक घेतलेली नाही. विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्याने उड्डाणपुलाच्या दुरुस्ती किंवा पुनर्निर्माणाबाबत कोणतेही स्पष्ट नियोजन जाहीर झालेले नाही. पर्यायी मार्ग, वाहन वळवणी, वाहतूक पोलीस वाढवणे, अनावश्यक बॅरिकेट्स हटविणे यासंदर्भात कोणतेही नियोजन प्रशासनाने जाहीर केले नसल्याचा आरोपही करण्यात आला.

### दुरुस्ती की तोडकाम

उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू होणार की तोडकाम होणार, याबाबतही स्पष्टता नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांत अशा प्रकरणांमध्ये काही महिन्यांत काम सुरू होते, मात्र अमरावतीत गेल्या चार महिन्यांत एक वीटदेखील हलविली गेलेली नाही, अशी टीका काँग्रेसने केली. संपूर्ण प्रकल्पाचा आराखडा, खर्चाचा तपशील आणि वेळापत्रक याची तातडीने घोषणा करावी, अशी मागणी करण्यात आली.


### अन्यथा भिंत तोड जनआंदोलन

जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने सर्व विभागांची संयुक्त बैठक घेऊन वाहतूक व्यवस्थेबाबत त्वरित निर्णय जाहीर करावेत तसेच उड्डाणपुलाच्या भवितव्याबाबत अधिकृत माहिती नागरिकांना द्यावी, अशी मागणी काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनी केली. मागण्यांवर सात दिवसांत कार्यवाही न झाल्यास उड्डाणपुलावरील उभारलेल्या भिंतीविरोधात 'भिंत तोड' जनआंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला.–

# ८ फेब्रुवारी रोजी होणारी शिष्यवृत्ती परीक्षा रद्द, नवीन तारीख २२ फेब्रुवारी २०२६

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ ऐवजी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. त्यामुळे, शिष्यवृत्ती परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी नव्या वेळापत्रकानुसार आपल्या पाल्यांसाठी परीक्षाचे नियोजन करणे गरजेचे आहे.




केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.राज्यातीलअनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेचा दिवस बदलत नवीन तारीख २२ फेब्रुवारी २०२६ जाहीर केली आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शाळांनी व परीक्षा केंद्रांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

# श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाची विदयार्थीनी कु. प्रतिक्षा मणिकराव देशमुख कृषीथॉन, गुणवंत विदयार्थी पुरस्काराने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

युवकांचा शेतीतील सहभाग या विषयाला अनुसरून ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन व मीडिया एक्झिबिटर्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने सन १९९८ पासून 'कृषीथॉन' या अंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यंदा 'कृषीथॉन प्रदर्शनाच्या १८ व्या आवृत्तीचे आयोजन दि. १३ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान ठक्कर्स डोम नाशिक येथे करण्यात आले.

युवकांचा कृषीक्षेत्रातील सहभाग वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने कृषीथॉन २०२५ या प्रदर्शनात कृषी क्षेत्रात विशेष शैक्षणिक वाटचालीची दखल घेऊन, गुणवंत कृषी विद्यार्थी पुरस्कार' देऊन सन्मानित केले गेले. यात महाराष्ट्र भरातून निवडक ३० पुरस्कार्थींचा समावेश होता

श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाची अंतीम वर्षाची विद्यार्थीनी कु. प्रतिक्षा माणिकराव देशमुख हिला १७ नोव्हेंबर २०२५ रोजी कृषीथॉन गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आजच्या काळात कृषी क्षेत्रातील युवकांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने तसेच विद्यार्थ्यांचे कृषी क्षेत्रातील वाढते ज्ञान पाहता आलेल्या निवडीने कु. प्रतिक्षा देशमुख हिचे कौतुक व अभिनंदन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी देशमुख व सर्व सन्माननिय पदाधिकारी यांनी केले.महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. समीर लांडे, सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विदयार्थी व विद्यार्थीनींनी कु. प्रतिक्षाचे अभिनंदन व कौतुक केले आहे. महाविदयालयातर्फे संपर्क अधिकारी म्हणून प्रा. जितेंद्र दुर्गे यांनी कामकाज पाहिले.



# कैटचा स्वदेशी रथ आजपासून जिल्हा दौऱ्यावर

## आज वरुडहून रवानगी, उद्याला अमरावतीत आगमन

### विविध भागांत स्वागत, भ्रमण व विशेष कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती :**

स्वदेशी भावनेला प्रोत्साहन देणे आणि स्थानिक व्यापाराला चालना मिळावी या उद्देशाने व्यापार्यांच्या सर्वोच्च संघटना 'कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' (कैट) तर्फे काढण्यात आलेला स्वदेशी रथ आज २७ नोव्हेंबर रोजी वरुडहून अमरावती जिल्ह्यातील दौरा आणि विशेष कार्यक्रमांना सुरुवात करणार आहे. वरुड, मोर्शी आणि नांदगाव पेठ मार्गे हा स्वदेशी रथ परवा २८ नोव्हेंबर रोजी अमरावतीत दाखल होईल. शहरात या रथाचे कैट पदाधिकाऱ्यांकडून मोठ्या उत्साहात स्वागत केले जाणार आहे.

कैट पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्या २७ नोव्हेंबरच्या सकाळी वरुडमध्ये कैट टीमच्या नेतृत्वाखाली स्वदेशी रथाचे नगरभ्रमण होईल.

त्यानंतर दुपारी १२ वाजता हा रथ मोर्शीकडे प्रस्थान करेल आणि दुपारी १ वाजता मोर्शीत कैट टीमच्या उपस्थितीत स्वागत करण्यात येईल. तेथून पुढे दुपारी २ वाजता नांदगाव पेठ येथे स्वागत कार्यक्रम होईल, जिथे स्थानिक कैट टीम नेतृत्व करेल. त्यानंतर रथ बिझीलँड येथे पोहोचेल, जिथे कैट जिल्हा सचिव आत्माराम पुरस्वनी आणि जिल्हा उपाध्यक्ष पुरण लाला यांच्या नेतृत्वात भ्रमण केले जाईल.

पुढे सिटीलँडमध्ये जिल्हा उपाध्यक्ष अनुप हरवानी आणि ड्रीमलँडमध्ये जिल्हा उपाध्यक्ष वासुदेव कृष्णानी यांच्या नेतृत्वात रथाचे स्वागत होईल. ड्रीमलँडवरून पंचवटी आणि इर्विन मार्गाने सायंकाळी ३ वाजता रथ राजापेठ परिसरात दाखल होईल. त्यानंतर कैटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी. भारतीया यांच्या उपस्थितीत श्रमिक पत्रकार भवनात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे.

२८ नोव्हेंबरचा कार्यक्रम

२८ नोव्हेंबरला स्वदेशी रथाचा प्रवास कैट जिल्हाध्यक्ष गोविंद सोमानी यांच्या सक्करसाथ येथील प्रतिष्ठानातून सुरू होईल. या वेळी बी.सी. भारतीया आणि स्वदेशी आंदोलनाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. गोविंद सोमानी यांच्या नेतृत्वात स्वागत व संबोधन केले जाईल. या कार्यक्रमाला मुन्ना सेवक, मनोज खंडेलवाल, रामेश्वर गगड, सिमेश श्रॉफ, राजेंद्र भंसाली, श्रीकिशन व्यास आदी मान्यवर उपस्थित राहतील.

यानंतर जवाहर गेट येथे नितेश पांडे, दीपक व्यास आणि विक्की शर्मा यांच्या नेतृत्वात पुष्पवर्षा कार्यक्रम होईल. यात्रा मार्गावर हनुमानदासजी मानका आणि प्रकाश उदवानी स्वागत करतील. प्रभात चौकात रामदेव बाबा मित्र परिवार, तर सरोज चौकात प्रमींदर अरोरा, रुक्मणी वल्लभचे संचालक शिरभाते, तरुण शर्मा, संदीप गौडबोले, सुनील सरोदे आणि इतर व्यापाऱ्यांकडून स्वागत होईल. पुढे पुराणसेठ हबलानी स्वागत करतील.

जयस्तंभ चौकात प्रमुख स्वागत व संबोधन कार्यक्रम होईल, ज्यात पप्पूभाई गगलानी, सौरभ मालाणी, महेश आडवाणी, मनोज डपले, आनंद अग्रवाल, घनश्याम खंडेलवाल, गजु मुंदडा, अतुल कदमकर आणि विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहतील.

अंतिम कार्यक्रम राजकमल चौकात होणार असून येथे स्वागत व समारोपाचे भाषण केले जाईल. या कार्यक्रमात कैटची संपूर्ण टीम, महिला विंग, चेंबर ऑफ कॉमर्स, सीपीडीए, रिटेल किराणा असोसिएशन, मोबाइल असोसिएशन, टीव्ही असोसिएशन, विविध व्यापारी, सामाजिक आणि धार्मिक संस्था तसेच अनेक राजकीय प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन कैट अमरावती जिल्हाध्यक्ष गोविंद सोमानी आणि त्यांच्या टीमच्या कुशल नेतृत्वात करण्यात आले आहे. कार्यक्रमात स्वदेशी जागरण मंचाचे पदाधिकारी, कैट राष्ट्रीय कोऑर्डिनेटर श्याम शर्मा, विदर्भ अध्यक्ष विनोद कलंत्री आणि विदर्भ महामंत्री सौरभ मालाणी विशेष उपस्थिती दर्शवणार आहेत.

# अमली पदार्थाविरोधात व्यापक कार्यवाही करावी

### - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**



युवकांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात यावी, तसेच अमली पदार्थाचे वितरण होत असलेल्या ठिकाणावर लक्ष ठेवण्यात यावे. प्रामुख्याने परराज्यातून येणार्या गांजा आणि इतर पदार्थांविरोधात व्यापक कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. नार्को को-ऑर्डिनेशन सेंटरची जिल्हास्तरीय समितीची मासिक सभा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात यावे. यात प्रामुख्याने शाळकरी विद्यार्थी लक्षगट ठेवण्यात यावे. अमली पदार्थाविरोधात व्याख्यान देणार्या वक्त्यांना शाळा-महाविद्यालयांशी संपर्क साधून त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. शहरातील मोठ्या शाळांमध्ये आठवड्यातून एकदा व्याख्यान होण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच विद्यार्थ्यांना अमली पदार्थाविरोधात माहिती देण्यात यावी. त्यासोबतच शासनाच्या पत्रव्यवहारावर 'नशामुक्त भारत, खुशहाल भारत' ही टॅगलाईन उपयोगात आणावी.

# तिवसा तालुक्यात फार्मर कप शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७तिवसा** ३गावातील स्थानिक शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पाणी संवर्धन आणि पीक व्यवस्थापनाचे अद्ययावत ज्ञान मिळावे तसेच गटशेतीचे महत्त्व कळावे, या उद्देशाने पाणी फाउंडेशनच्या वतीने तिवसा येथे आयोजित 'फार्मर कप शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम' उत्साहात पार पडला. कल्याणी वडसकर यांनी पाणी फाऊंडेशन कार्यप्रणाली बाबत माहिती दिली आणि विविध तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करून उत्पादनवाढीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तिवसा तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. तसेच महाविस्तार ॲप बद्दल पूर्ण माहिती समजून सांगितली त्यात अवजार बँक, बाजारभाव, हवामानातील बदल माहिती, पिकांची ओळख आणि रोग व्यवस्थापन, किड व्यवस्थापन, पिक सल्ला, डिजिटल शेती यावर मार्गदर्शन केले. डिजिटल शेती शाळा प्रत्येक पिकांच्या,फार्मर कपबाबत माहिती दिली तसेच उत्पादनखर्च कमी करून दर्जेदार शेती कशी करावी, पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, हवामान बदलाचे परिणाम आणि त्यावरील उपाययोजना यावर प्रशांत देवळे यांनी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची गरजही व्यक्त केली. नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला उपस्थित तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे, मंडळ कृषी अधिकारी एस .भालेराव, आर. चुळे , सदरील कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन सचिन हरले यांनी केले सोबतच कुऱ्हा येथील प्रगतशील शेतकरी निखिल तेटू उपस्थित होते. आणि कृषी सहाय्यक अधिकारी तसेच पाणी फाऊंडेशन टीम सन्मवयक कल्याणी वडसकर, तुषार तायवाडे, जय कुमार सोनुले, प्रश्नांत देवळे, रेणुका पोहकार, स्वप्नील डोंगरे आणि शेकडोंच्या संख्येने शेतकरी बांधव या शेतकरी प्रशिक्षणाला उपस्थित होते.-

# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा महादेवखोरी परिसरात दौरा; विकासकामांना गती देण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती-**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज महादेवखोरी परिसराचा सविस्तर दौरा करून तेथील चालू असलेल्या विकासकामांची आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. सकाळी लवकर सुरू झालेल्या या पाहणीदरम्यान आयुक्तांसोबत विविध विभागांचे अधिकारी, अभियांत्रिकी शाखेचे कर्मचारी तसेच स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.दौऱ्यादरम्यान आयुक्तांनी परिसरातील स्वच्छता व्यवस्था, कचरा संकलन, नालेसफाई, पाणीपुरवठा व्यवस्था आणि रस्त्यांची स्थिती यांचा बारकाईने अभ्यास केला. काही ठिकाणी कचरा संकलनात झालेल्या विलंबाबद्दल त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले. नालेसफाईची कामे गतीमान करण्यासह सर्व नाल्यांतील अडथळे पूर्णपणे दूर करण्याचे आदेश त्यांनी दिले.महादेवखोरी परिसरातील नागरिकांनी पाणीटंचाई, रस्त्यांची खराब अवस्था आणि सार्वजनिक प्रकाशयोजनेतील अडचणींबाबत आयुक्तांकडे तक्रारी मांडल्या. आयुक्तांनी प्रत्येक तक्रारीची नोंद करून संबंधित विभागांना त्वरित उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.त्या म्हणाल्या, महापालिकेचे उद्दिष्ट नागरिकांना प्रभावी आणि वेळेवर सेवा देणे आहे. कोणत्याही सुविधेबाबत होणारी दिरंगाई सहन केली जाणार नाही.परिसरातील अनेक प्रलंबित कामांचा आढावा




घेत आयुक्तांनी ठेकेदार आणि अधिकाऱ्यांना निश्चित वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. रस्ते काँक्रीटीकरण, ड्रेनेज लाईन दुरुस्ती आणि पाणीपुरवठा व्यवस्था सुधारणा प्रकल्पांना विशेष प्राधान्य देण्याचे त्यांनी नमूद केले.महादेवखोरी परिसरातील मूलभूत नागरी सुविधांची चाचपणी करत आयुक्तांनी पुढील काही दिवसांत विशेष स्वच्छता व पायाभूत सुविधा सुधारणा मोहिम राबवण्याची घोषणा केली. या मोहिमेत रस्ते दुरुस्ती, झाडांची छाटणी, नालेसफाई, ड्रेनेज लाइन तपासणी आणि प्रकाशयोजनेची देखभाल यांना प्राधान्य दिले जाणार आहे.या संपूर्ण पाहणी दौऱ्यादरम्यान महापालिकेने नागरिकांसाठी अधिक सक्षम, सुटसुटीत आणि सुरक्षित नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा हा दौरा प्रशासन नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तत्काळ उपाय योजना करण्यास किती कटिबद्ध आहे, याचे द्योतक ठरला. अमरावती महानगर पालिकेच्या या पुढाकारामुळे महादेवखोरी परिसरातील विकासकामांना आणि सुविधा सुधारणा प्रक्रियेला निश्चितच गती मिळण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.या पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# मोर्शी न.प. निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप

## बॅनर्स-पोस्टर्स व पत्रक तयारीसाठी धावपळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मोर्शी-**



येथील नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी दि. २६ नोव्हेंबर रोजी अपक्ष नगराध्यक्षासह नगरसेवक पदासाठी निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या १९४ मुक्त चिन्हापैकी मागणी करण्यात आलेले चिन्ह वाटप करण्यात आले. चिन्हांच्या वाटपाने आता चित्र स्पष्ट झाले आहे.

नगराध्यक्ष पदासाठी एकूण ६ उमेदवार तर २४ नगरसेवक पदासाठी एकूण १२८ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या वतीने रेशमा नितीन उमाळे, काँग्रेस तर्फे दीपाली विपुल भडांगे, शिवसेना एकनाथ शिंदे गटातर्फे प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने, बहुजन समाज पार्टीतर्फे फरजानाबी हैदरशहा या चार उमेदवारांना पक्षाची चिन्हे प्राप्त झाली होती. नगराध्यक्ष पदासाठी उभ्याअसलेल्या मोर्शी नगरविकास आघाडी रोडे पॅनलतर्फे सोनलताई निलेश रोडे यांना शिलाई मशीन चिन्ह प्राप्त झाले. त्यांच्या गटातर्फे उभे असलेल्या नगरसेवकांना वेगवेगळी चिन्हे वाटप करण्यात आल्यामुळे त्यांच्या गटात नाराजी व्यक्त केली जात आहे. नगराध्यक्ष पदासाठी उभे असलेल्या दुसऱ्या उमेदवार दर्शना आशिष टाकोडे यांना शिट्टी चिन्ह देण्यात आले. नगरसेवक पदासाठी उभे असलेल्या १२८ उमेदवारांना विविध मुक्त चिन्हाचे वाटप करण्यात आले. अमान्यताप्राप्त पक्षाचे उमेदवार निवडणूक रिंगणात असून ते अध्यक्ष व सदस्य पदाकरिता समानचिन्ह मिळण्यासाठी आग्रही होते. त्यासाठी मात्र निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे गरजेचे होते. त्यामुळे नोंदणीकृत नसलेल्या अमान्यप्राप्त पक्षाला सारखे चिन्ह मिळू शकले नाही.

# रॉयल्टीशिवाय ट्रक वापरून बेकायदेशीरपणे वाळूची वाहतूक

## २१ लाख रुपयांचा माल जप्त करीत तीन आरोपींविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७शेंदुर्जना घाट-** अवैध वाळू तस्करांना रोखण्यासाठी ग्रामीण पोलिसांकडून विविध मार्गांवर सतत नाकाबंदी करून लाखो रुपयांचा माल जप्त केला जात आहे. अशातच मंगळवारी रात्री उशिरा शेंदुराजघाट परिसरात ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वाळू तस्करी प्रकरणात २१ लाख रुपयांचा माल जप्त करीत तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.माहितीनुसार, रात्री १२ वाजता ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांचे पथक शेंदुरजना घाट पोलिस स्टेशन परिसरात गस्त घालत होते. गोपनीय माहितीवरून पोलिसांनी वरुड-पुसला रस्त्यावर सापळा रचला आणि शहराकडे जाणारा एक ट्रक थांबवला. तपास आणि शोधघेतल्यानंतर असे आढळून आले की आरोपी परवानगीशिवाय आणि रॉयल्टीशिवाय ट्रक वापरून बेकायदेशीरपणे वाळूची वाहतूक करत होते. आरोपी ओव्हरलोड वाहन चालवत असल्याचेही आढळून आले. या कारवाईदरम्यान, आरोपींकडून अंदाजे १ लाख रुपये किमतीचे १० ब्रास वाळू आणिटल-२७-इ-२२२२ क्रमांकाचा टाटाहिवाट्रक, एकूण २१ लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणात, अतिरिक्त पोलीस निरीक्षक सागर हटवार यांच्या तक्रारीवरून, आरोपी राहुल बाबुराव वानखेडे (३७, वडली, अमरावती), उमेश राजा देशमुख (३८, गवळीपुरा) आणिप्रसाद भूगुल (हर्षराज कॉलनी) यांना ताब्यात घेण्यात आले आहे आणि त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात १० महिन्यांत १७० शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती** कर्ज, उसनवारी आणि रोजच्या जगण्याचा खर्च कसा भागवायचा, या सर्व विवंचनेने शेतकऱ्यांना ग्रासले आहे. यातूनच अवघ्या दहा महिन्यांत जिल्ह्यात तब्बल १७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे सरकारी आकडेवारीतून पुढे आले आहे. ऑगस्ट महिन्यात सर्वाधिक २६ आत्महत्या झाल्या आहेत. त्यापैकी निकषानुसार ४५ पात्र तर ३३ अपात्र ठरवण्यात आल्या आहे. तसेच ९२ चौकशीसाठी प्रलंबित असून ३ प्रकरणे फेरचौकशीसाठी पाठवण्यात आले आहे. ४३ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत देण्यात आल्याचे शासनाने सांगितले आहे. तर दोन प्रकरणात मदत देण्यात आलेली नाही.शेतीचे चित्र बदलत जीवनात आनंदाचे दिवस येतील, या आशेने देशातील शेतकऱ्यांनी परिवर्तनाचे अस्त्र उगारले आणि सत्ता बदलली. मात्र त्यानंतरही चांगले दिवस येण्याची प्रतिक्षा संपली नसल्याचे चित्र सद्या दिसून येत आहे.



राज्यासह जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

शेती विषयक धोरणांमध्ये कोणताहीबदल झाला नाही. हे मोठ्या प्रमाणात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरुन दिसून येते. सोयाबीनचे पडलेले भाव, बाजार समित्यांमध्ये हमीभावा पेक्षा कमी दराने होणारी खरेदी, बोगस बियाणे, सावकारी कर्ज, बँकांचे कर्ज, खर्च अशी विदारक स्थिती असल्याने अधिक अन् उत्पादनाला भाव कमी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे.

**दहा महिन्यांत एकूण शेतकरी आत्महत्या**

(महिनानिहाय) जानेवारी १२, फेब्रुवारी १०, मार्च १६, एप्रिल १६, मे २५ जून २१, जुलै १८, ऑगस्ट २६, सप्टेंबर १६, ऑक्टोबर १०, एकूण १७०

# नांदगाव न.पं.च्या निवडणुकीत घराणेशाहीला दिले झुकते माप

## निष्ठावान कार्यकर्त्यांच्या उपेक्षेमुळे असंतोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नांदगाव खंड-**

नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत निवडणुकीसाठी सध्या राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. सर्वच पक्षांमध्ये उमेदवारांची यादी जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये काहीशी नाराजी पसरली असून, विशेषत: पक्षनिष्ठ आणि दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची उघडपणे उपेक्षा झाल्याचे चित्र दिसत आहे.या निवडणुकीत सर्वच प्रमुख पक्षांनी उघडपणे घराणेशाहीला झुकते माप दिल्याची उदाहरणे शहरातील विविध प्रभागांत आढळून आली आहे.

नगर पंचायतीमध्ये एकूण १७ प्रभाग असून त्यापैकी अनेक ठिकाणी नवरा-बायको, दीर-वहिनी तसेच भावकीतील उमेदवार यांना तिकिटे देण्यात आली आहेत. यामुळे मतदारांत नाराजीचे सूर अधिक तीव्र झाले असून, ही पक्षाची उमेदवारी की नेत्यांच्या घरातील जहागिरदारी ? असा टोकदार सवाल मतदार उघडपणे विचारू लागले आहेत.

वर्षानुवर्षे पक्षासाठी रात्रंदिवस कष्ट केलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी या निर्णयाला उघडपणे विरोध दर्शवला आहे. आपण वर्षानुवर्षे पक्षाचे ध्वजवाहक राहिलो, सभा-मेळावे, प्रचार, सर्व कामे केली आणि उमेदवारी मात्र अचानक घरातील व्यक्तीला ? मग आम्ही सतरंज्या उचलण्यासाठीच आहोत का ? असा संतापही व्यक्त केला जात आहे.

या असंतोषामुळे अनेक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अंतर्गत तणाव निर्माण झाले असून काही ठिकाणी स्वतंत्र उमेदवारीची चर्चादेखील सुरू झाली आहे. काही पक्षांनी तर चक्क ठेकेदार, मद्य व्यवसायींनाही उमेदवारी दिल्याची जोरदार चर्चा शहरभर रंगली आहे. तर दुसरीकडे नेतृत्वाने यावर मौन बाळगल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे मतदानाच्या अगदी तोंडावर दुसऱ्या पक्षांतून आलेल्या काही लोकांनादेखील ताबडतोब उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे वर्षानुवर्षे पक्षाशी प्रामाणिक राहिलेल्या




स्थानिक कार्यकर्त्यांचा संताप अधिक भडकला असून, निष्ठा व्यर्थ, स्वार्थच सर्व काही अशी भावना वाढीस लागली आहे.

सुजाण मतदारांनी विचारावे विकासासाठी विविध प्रश्न या सर्व घडामोडींमुळे शहरात राजकीय अस्थिरता आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर दुसरीकडे विविध सामाजिक संस्थांनी मतदारांना आवाहन करुन या सर्व बाबींचा समाचार घेण्याकडे लक्ष द्यावे, असे म्हटले आहे. घराणेशाही, पैशाची देवाणघेवाण आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची उपेक्षा करणाऱ्यांना सुजाण मतदारांनी प्रश्न विचारावेत, असे म्हटले आहे.

# थंडीमुळे कापूस फुटण्याचा वेग मंदावला; उत्पादन घटण्याची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर**

अचलपूर,दर्यापूर परिसरात पहिल्या कापूस वेचणीत प्रतिएकर तीन ते सहा क्विंटलपर्यंत उत्पादन हाती आले आहे. मात्र, वाढत असलेल्या थंडीमुळे कापूस वेचणीचा वेग मंदावणार असल्याचे बोलले जात आहे. तसेच, कापूस वेचणी मजुरीचे दर घटल्यामुळे परराज्यातून आलेल्या शेतमजुरांना रोजगार शोधण्याची वेळ येऊ शकते.

चालू हंगामातील खरीप पेरणी मृग नक्षत्रात सुरू होऊन आर्द्रा नक्षत्राच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाली. पूरबाधित क्षेत्र वगळता तालुक्यातील बहुतांश पेरण्या यशस्वी झाल्या.दिवाळीच्या सुमारास कापूस वेचणीला सुरुवात झाली असताना अचानक अवकाळी पावसाने पुन्हा वेचणी ठप्प झाली. त्यानंतर मजुरांची टंचाई भासू लागल्याने अनेक शेतकऱ्यांनी शेजारच्या राज्यांतून मजूर बोलावून वेचणी पूर्ण केली. अपवाद वगळता या पहिल्या वेचणीत अनेकांना समाधानकारक उत्पादन मिळाले आहे.गत आठवड्यात थंडीचा जोर वाढल्याने कपाशीची बोंडे उघडण्याची प्रक्रिया मंदावली आहे. त्यामुळे पुढील १५ ते २० दिवस कापूस वेचणी थांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत यापूर्वी १२ ते १३ रुपये किलो असलेली मजुरी आता ९ ते १० रुपयांवर आलेली आहे. परिणामी, बाहेरून आलेल्या शेतमजुरांना पर्यायी रोजगाराचा शोध घ्यावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला स्थगिती; सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने

## नीलेश राणेंनी केलेली व्हिडिओ शुटिंग योग्य नाही- चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

देवेंद्र फडणवीस यांचे सरकार हे आधीपासूनच शेतकऱ्यांच्या बाजूने उभे आहे. यापूर्वीही आम्ही सांगितले होते की शेतकऱ्यांच्या गळ्याशी येत असेल तर सरकार काही निर्णय घेईल म्हणून आम्ही शेतकरी कर्ज वसुलीला स्थगिती दिली आहे. ज्यामुळे कोणीही शेतकऱ्यांच्या घरी जात तगादा लावणार नाही, असे भाजपचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, कुणी जर चुकीचे असेल तर निवडणूक आयोग आणि पोलिस कारवाई करतील. पण ज्यांच्या घरात पैसे आहेत ते त्यांनी कुठून आणले आहेत, कोणत्या व्यवहारातून आणले आहेत. हे सर्व पोलिस तपासतील. यामुळे भाजप कार्यकर्त्यांच्या घरात पैसे सापडले हे ठीक आहे पण कुणाच्या घरात, बेडरूममध्ये जात हे स्टिंग ऑपरेशन करण्याचा अधिकार आहे का? हे बघावे लागेल, असे मालवण-मध्ये भाजप कार्यकर्त्यांच्या घरात सापडलेल्या पैशाच्या बँग प्रकरणी बावनकुळे यांनी म्हटले आहे.



**पोलिस योग्य दखल घेतील**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नीलेश राणे यांनी असे का करावे हे मला माहिती नाही. पण कुणाच्या बेडरूमपर्यंत जात अशी व्हिडिओ शुट करणे हे मला नियमाच्या बाहेर वाटते आहे. पण नीलेश राणेंनी पोलिसांच्या आणि निवडणूक आयोगाच्या ही गोष्ट लक्षात आणून दिली आहे तर याची ते योग्य दखल घेतील, या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे.

**शरद पवारांनी निधीबद्दल बोलणं योग्य नाही**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सरकारच्या योजनांची मांडणी आम्ही करत असतो. निधी द्यायचे अधिकार सरकारकडे आहे. तिन्ही पक्ष निधी द्यायचा निर्णय घेतात.सर्वांना निधी देण्याचा अधिकार आहे तो निर्णय अंतिम करण्याचे काम मुख्यमंत्री करत असतात. शरद पवारांनी अनेक वर्षे सरकार चालवले आहे, अनेक वर्ष त्यांनी निधी वाटप केले आहे. त्यांनी अनेक निवडणुका या निधीची घोषणा करत जिंकल्या आहेत. त्यामुळे शरद पवार यांनी आता इतक्या उशिरा आम्हाला हे सांगणे योग्य नाही.

**शशिकांत शिंदेंनी हुरळून जाऊ नये**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सोलापुरातील एका तालुक्यात शिंदेंची शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची युती झाली त्यामुळे शशिकांत शिंदे यांनी हुरळून जाऊ नये.अनेक ठिकाणी अशा वेगवेगळ्या युती झाल्या आहेत. स्थानिक राजकारणामध्ये मित्र पक्षांची पटले नाही तर कुणी शरद पवारांना सोबत घेतले तर कुठे धनुष्यबाण आणि काँग्रेस सोबत आहे. कार्यकर्त्यांची निवडणूक ८ ते १० वर्षांनी होत असल्याने प्रत्येक जण निवडणूक लढवत आहे.परिवहन आणि महसूल विभाग एकत्र आला आहे. यापूर्वी पोलिस विभाग आमच्यासोबत होताच. आता अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना लगाम घालणार आहोत.

# स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट ज्वारीचे वितरण! रेशन कार्ड धारकांत संताप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मोर्शी**

शासकीय स्वस्त धान्य दुकानांतून मिळणाऱ्या अन्नधान्याचा दर्जा दिवसेंदिवस खालावत चालला असून, आता तर रेशन कार्डधारकांना थेट निकृष्ट दर्जाची ज्वारीचे वितरण होत असल्याने बीबी परिसरात तीव्र नाराजी उसळली आहे. गव्हाऐवजी मिळणारी ही ज्वारी केवळ वासाने कुबटच नाही, तर किडयांनी पोखरल्यामुळे 'फुफाटा' झाल्याचे धक्कादायक वास्तव आहे.

शासन गरिबांच्या अन्नाची सोय म्हणून मोफत किंवा कमी किमतीत धान्य पुरवठा करते. मात्र, बीबी येथील स्वस्त धान्य दुकानातून मिळणाऱ्या ज्वारीचा दर्जा इतका निकृष्ट आहे की हे धान्य खावे की फेकून द्यावे, असा प्रश्नच नागरिकांना पडला आहे.

धान्य हाताळताना किडे दिसणे, अजीब वास जाणवणे ही दृश्ये पाहून नागरिक संतापले आहेत. वरती एवढे असूनही तक्रार केल्यास दुकानदाराने फुकटच्या धान्यापेक्षा अजून काय चांगले देऊ,' असा उर्मट प्रतिसाद दिल्याने नागरिक आणि दुकानदार यांच्यात वाद, तक्रारी आणि तणाव वाढले आहेत. यापेक्षा चांगले भरडधान्य गुरांना दिले जाते, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. स्वस्त धान्य दुकानांतील साठवणुकीकडे दुर्लक्ष, धान्याची निगा राखण्यात झालेल्या त्रुटी आणि पुन्हा पुन्हा येणाऱ्या तक्रारींमुळे स्थानिक प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# उमेदवारांना आठवला दुर्लक्षित कार्यकर्ता

## उमेदवारांकडून घरी जाऊन केली जात आहे विचारपूस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७धामणगाव रेल्वे**

नगरपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारांना दुर्लक्षित कार्यकर्ताही आठवू लागला आहे. सोबत प्रचारात असलेल्या कार्यकर्त्यांकडून दुर्लक्षित कार्यकर्त्याची माहिती घेतली जात आहे. त्याला निरोप पाठवून घरी भेटायला येत असल्याचे सांगून तिथे पोहोचत आहेत. जास्तीत जास्त कार्यकर्ते जमविण्यासाठी हा फंडा वापरला जात आहे.

नगर पंचायत निवडणुकीच्या प्रचाराला कमी दिवस असल्याने प्रत्येक उमेदवाराला कार्यकर्ता महत्त्वाचा वाटू लागला आहे. मतदारांपर्यंत पोहोचू शकलो नाही तरी कार्यकर्त्याच्या घराघरांत ओळख माध्यमातून पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विविध कारणांमुळे तुटलेला कार्यकर्ता जोडण्यासाठीही उमेदवारांची विविध माध्यमांतून धडपड सुरू असल्याचे दिसून येत आहे. कामे झाली नाही म्हणून, संपर्क ठेवला नाही म्हणून दूर गेलेले कार्यकर्ते जवळ आणण्याचे प्रयोग सुरू आहेत. त्यासाठी विविध फंडे वापरण्यात येत आहेत.दूर गेलेल्या




कार्यकर्त्याच्या घरीच बैठका घेणे, विविध आश्वासने देणे असे प्रकार केले जात आहेत. शिवाय, तूच आपला किती विश्वासू आहे, हे पटवून देण्यासाठी त्याच्यावर अधिकाधिक जबाबदाऱ्या टाकल्या जात आहेत. यात अनेक ठिकाणी खिसा ढिला करण्यासाठी मागे-पुढे पाहिले जात नाही.

**पहिल्या टप्प्यात ओळख पटविण्यावरच भर!**

आता चिन्ह मिळाल्यानंतर प्रचाराकरिता फार कमी दिवस मिळणार असल्याने, पहिल्या टप्प्यात मतदारांपर्यंत पोहोचून आपली ओळख देण्याचा प्रयत्न अपक्ष उमेदवारांकडून करण्यात आला. वेळ कमी सोंग फार, अशी अपक्ष उमेदवारांची स्थिती आहे. यापूर्वी लगेच चिन्ह मिळत होते. त्यामुळे लगेच चिन्हासह प्रचार केला जात होता. आता मात्र अपक्षांकरिता अडचणीचे झाले आहे.

# इथियोपिया ज्वालामुखीचा परिणाम नागपूरला येणाऱ्या विमानांना विलंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

इथियोपियातील हायली गुब्बी ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडलेल्या राखेच्या ढगामुळे दिल्ली, मुंबई, हैदराबाद, पुणे, बेंगळुरू या विमानतळांवरून नागपूरकडे येणाऱ्या उड्डाणांना मोठ्या प्रमाणात विलंब झाला. उड्डाणांच्या वेळापत्रकात झालेल्या बदलांमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

बुधवारी सायंकाळी दिल्ली-नागपूर इंडिगोची उड्डाण एक तास आठ मिनिटांनी उशिरा पोहोचली. तसेच बेंगळुरू, पुणे, दिल्ली आणि मुंबईहून येणाऱ्या इतर उड्डाणांवरही परिणाम झाला आहे. इंडिगोची ६५२९ क्रमांकाची दिल्ली-नागपूर उड्डाण



जी संध्याकाळी पावणे सात वाजता निघणे अपेक्षित होते, ती एक तास आठ मिनिटांच्या उशिराने रात्री ७.४४ वाजता नागपूरसाठी रवाना झाली.मुंबई-नागपूर उड्डाण क्रमांक ६ई६८६ हे ८.५ वाजता सुटणे अपेक्षित असूनही दीड तास उशिरा सुटले. हे विमान रात्री १२ वाजता नागपूरला पोहोचले. बेंगळुरू-नागपूर उड्डाण क्रमांक ६ई४८६ हे तीन तास ४० मिनिटे उशिरा दाखवत होते. हे विमान दररोज ८.५ वाजता बेंगळुरूहून सुटून ९.५५ वाजता नागपूरला पोहोचते. मात्र बातमी लिहीपर्यंत या विमानाने उड्डाण केले नव्हते.

इंडिगोची दिल्ली-नागपूर ६ई६५३० ही उड्डाणही एक तास १६ मिनिटे उशिरा रात्री १०.३० वाजता सुटली आणि रात्री सव्वाबारा वाजता नागपूरला पोहोचली. रात्री ११ वाजता सुटणारी इंडिगोची ६ई२७३८ ही उड्डाणही बातमी लिहीपर्यंत एक तास ३५ मिनिटे उशिरा दाखवत होती. इंडिगोची पुणे-नागपूर ६ई६७९८ ही दुपारी सव्वा बारा वाजता सुटणारी उड्डाण एक तास उशिरा निघून दुपारी पावणेतीन वाजता नागपूरला पोहोचली.

# भूषण गवई राजकारणात जाण्याची चर्चा असतानाच मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ते सरन्यायाधीश होताच



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नागपूर**

माजी सरन्यायाधीश भूषण गवई हे आता न्यायपालिकेतून निवृत्त झाले आहेत. निवृत्तीनंतर ते आता कुठल्या भूमिकेत दिसणार असा प्रश्न अनेकजण उपस्थित करत आहेत. आतापर्यंत अनेक सरन्यायाधीशांनी निवृत्तीनंतर राज्यपालपद किंवा राज्यसभा सदस्यत्व स्वीकारल्याचं किंवा केंद्रशासित प्रदेशाचं प्रमुखपद सांभाळल्याचं आपण पाहिलं आहे. त्यामुळे गवई देखील त्याच वाटेने जाणार की राजकारणात प्रवेश करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अशातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रचार करीत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण विधान केलेलं आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

नागपूर जिल्ह्यातील वाडी नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी आले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक विषयावर चर्चा केली. फडणवीस म्हणाले की, आम्ही अनेक प्रश्न एका वर्षात मार्गी लावलेले आहेत. झुडपे जंगलातील जमिनीचा प्रश्न हा आम्ही मिटवला. नागपूरचे भूषण असलेले माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी पदभार स्वीकारताच झुडपी जंगलासंदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिला. त्यामुळे अनेकांना दिलासा मिळालेला आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# अमरावती महानगरपालिकेत 'बाल आनंद महोत्सव २०२५'चा जल्लोष




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती महानगरपालिका शिक्षण विभाग तसेच महिला व बालकल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ व २७ नोव्हेंबर २०२५ रोजी बाल आनंद महोत्सव २०२५ चे भव्य आयोजन सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी हा दोन दिवसीय उत्सव आनंद, कौशल्यविकास आणि सृजनशीलतेचा सोहळा ठरणार आहे.महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात चित्रकला, नृत्य, गायन, खेळ, हस्तकला, विज्ञान प्रदर्शन, गोष्टी कथन, तसेच मुलांमधील नैसर्गिक गुणांना वाव देणारे अनेक उपक्रम समाविष्ट करण्यात आले आहे.या महोत्सवाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, त्यांच्या कलेला आणि कौशल्याला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. महोत्सवात शिक्षक, पालक आणि स्थानिक प्रशासन यांचे सहकार्यही उत्स्फूर्तपणे मिळत असल्याचे सांगण्यात आले.या दोन दिवसीय बाल आनंद महोत्सवामुळे महानगरपालिका शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांना एक अनोखा अनुभव मिळत असून, उत्सवाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.

# करा ओके क्लबची धर्मेंद्र यांना श्रद्धांजली:'ये दोस्ती हम नही छोडेंगे'

## अशा एकाहून एक सरस गीतांचे सादरीकरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

संगीत साधना कराओके क्लबने बॉलीवूडचे दिग्गज अभिनेता स्व.धर्मेंद्र यांना त्यांच्या गाजलेल्या चित्रपटातील गितं गाऊन श्रद्धांजली अर्पण केली. यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. धर्मेन्द्र यांचा जन्म ८ डिसेंबर, १९३५ रोजी झाला. हिंदी चित्रपटांमधील लोकप्रिय अभिनेते धर्मेंद्र होते. इ.स. १९६० साली अभिनयक्षेत्रात पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी २०११ सालापर्यंत २४७ चित्रपटांमधून भूमिका केल्या.

त्यांनी २४ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथे त्यांच्या निवास्थानी अखेरचा श्वास घेतला. अशा या महान अभिनेत्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात क्लबचे संचालक चंद्रकांत पोपट यांनी आया है मुझे फिर याद हे गीत गायन करत श्रद्धांजली अर्पण केली, तर सहसंचालक सुरेश वसानी यांनी पल पल दिल के पास हे गीत सादर केले.

चंद्रकांत पोपट आणि सचिन रासने यांनी सात अजूबे इस दुनिया मे, गीत गाऊन स्व. धर्मेंद्र यांना श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमात क्लबचे इतर सदस्यही उपस्थित होते. ज्यात राजेश चंद्रपुरे, विदिशा चंद्रपुरे, राहुल माहुले, सुषमा मुनोत, अजय देशमुख, वृषाली काळे, पुनम अलकारी, सरोज गुप्ता, संगीता बहुरपी, वैभव कुबडे, मीनल हिवराळे, युगंधरा साऊरकर, देवेंद्र ठाकरे, राजश्री बोरखडे, नीलिमा देशमुख, राजू हिरुळकर, राखी पांचाळे, लता दाभाडे, मंगला सानप, राजूला बोरकर, जानवी बल्लाळ, प्रवीण जाधव, रेणुका देशपांडे, सुनिता व्यास, जीवन गोरे, संतोष घुगे, उषाकिरण, विजयकर, संगीता ठाकरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात धर्मेंद्र यांच्या लोकप्रिय गाण्यांचा विस्तृत कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये तुम जो चले गये, तू आजा तेरी याद आई, मै जट यमला पगला दिवाना, झिलमिल सितारों का आँगन होगा, ड्रीम गर्ल, किसी शायर की गझल, दुनिया ओ दुनिया, तेरा जवाब नहीं, हम बेवफा हरगीज ना थे, कोई हसीना जब रूठ जाती है तो, कुछ कहता है ये सावन, रसिया ओ मेरी महबूबा, कहानिया सुनाती है, मिलती है जिंदगी में मोहब्बत कभी कभी असे सगीत गायीले.

# शिक्षक मतदारसंघात नावे समाविष्ट करण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर, गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शिक्षक मतदारसंघाच्या यादित नावे समाविष्ट करण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याने दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हातुर्णा येथील कै. पंजाबराव ठाकरे कृषी अभियांत्रिकी शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी आरोपीविशाल राजकुमार ठाकरे आणिरूपराव सदाशिवं पेटे यांचा यामध्ये समावेश आहे.शिक्षक मतदार संघाच्या मतदार संघातत्यांची नावे समाविष्ट करण्यासाठी अर्जात स्वतःची 'शिक्षक' म्हणून नोंदणी केली.




सर्व आरोपी हातुर्णा कृषी अभियांत्रिकी शाळेतील असल्याचे आढळून आले आहे. तक्रारदार, तहसील कार्यालय अधिकारी अरुण रामचंद्र पाटणे यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाच्या आधारे, आरोपींविरुद्ध फसवणुकीच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरुड पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# नांदुरा गावाजवळ भीषण अपघात १८ वर्षीय तरुण ठार, चार जण गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ वलगाव**

अमरावती-चांदूरबाजार महामार्गावरील नांदुरा गावाजवळ बुधवारी, सायंकाळी सहाच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका १८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. विरुद्ध दिशेने येणाऱ्या चारचाकी वाहनाने पॅसेंजर ऑटोला दिलेल्या जबर धडकेत मोठे नुकसान झाले. सायंकाळी गर्दीचा काळ असल्याने धडक प्रचंड होती आणि ऑटो पूर्णपणे



चेंगराचेंगरीसारखा चुराडा झाला.

अपघातात अनुराग राजेश तायडे (वय १८, रा. रोहणखेडा, जिल्हा अमरावती) हा तरुण जागीच ठार झाला. धडक बसताच तो वाहनात अडकला होता. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, धडक इतकी तीव्र होती की बचावकार्य सुरू करण्यासाठी काही काळ स्थानिक नागरिकांनाही मदत करावी लागली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी येऊन वाहतूक सुरळीत करण्याचे काम हाती घेतले.

जखमींमध्ये सय्यद सादिक सय्यद नूर (वय ४७, रा. रजा नगर, बडनेरा), सय्यद असलम सय्यद बशीर (वय ४५, रा. नवी वस्ती, बडनेरा) यांच्यासह दोन महिलांचा समावेश आहे. सर्वजण पॅसेंजर ऑटोमध्ये प्रवास करीत होते. सर्वांना तातडीने म्बुलन्सद्वारे अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांच्या माहितीनुसार, जखमींची अवस्था गंभीर असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच वलगाव पोलिस ठाण्याचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी परिस्थितीचा ताबा घेत पंचनामा सुरू केला. महामार्गावर तात्पुरती वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर वाहनांची वेगवान वाहतूक होत असल्याने अपघातांची शक्यता कायम असते. नागरिकांनी येथे वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी 'भोजनावळी' प्रचाराच्या उधाणासोबतच भोजनावळीचीही होतेय धूम

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अचलपूर**

नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रिंगणातील उमेदवारांचे चित्र आता स्पष्ट झाले असून, प्रचाराला वेग आला आहे उमेदवारांच्या प्रचारासाठी कार्यकर्तेही मोठ्या उत्साहाने जुटले आहेत. याच पार्श्वभूमीवर काही उमेदवारांनी कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी भोजनावली' सुरू केल्याचे दिसून येत आहे. कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार जेवणाची व्यवस्था करण्यात येत असून, त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांचे घरचे जेवण मतदान होईपर्यंत तरी बंद राहणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर इच्छुक उमेदवारांनी सक्रियता वाढवली. काही धनाढ्य इच्छुकांकडून तर आतापासूनच अधूनमधून पाटांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना प्रसन्न ठेवण्याचे प्रयत्न सुरू होते



## स्वयंपाकासाठी आचारीच ठरवून घेतला!

मतदानाला आता काहीच दिवसांचा कालावधी शिल्लक असून, आताच कार्यकर्त्यांची खरी गरज आहे. सकाळपासूनच उमेदवार प्रचारासाठी निघत असून, कार्यकर्तेही त्यांच्यासोबत राहत आहेत. शिवाय, अन्य कामेही कार्यकर्ते आटोपून घेत असल्याने त्यांच्या जेवणाची सोय करणे गरजेचे आहे. यामुळे मतदानापर्यंत उमेदवारांनी स्वयंपाकासाठी आचारीच ठरवून घेतला आहे. आता निवडणुका होईस्तोवर कार्यकर्तेही बिनधास्त आहेत. काही ठिकाणी ठरावीक जागा भोजनावळीसाठी निश्चित करून देण्यात आल्याची चर्चा आहे.

आता प्रचाराची वास्तविक धांदल सुरु झाल्याने कार्यकर्त्यांवर झालेले हे खर्च उमेदवारांच्या कामी येत असल्याचे दिसते. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच उमेदवारांकडून कार्यकर्त्यांच्या सोयीसुविधांची सरबराई आणखी वाढवण्यात आली आहे.

# चिखलदरा एसटी बसस्थानकावर दोन अस्वली! ग्रामस्थ व प्रवाशांत भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ चिखलदरा**

चिखलदरा येथील एसटी बसस्थानक परिसरात दोन अस्वली दिसल्याने रात्री मोठी खळबळ उडाली. अचानक बसस्थानक परिसरात धावताना दिसलेल्या अस्वलींचे दृश्य अनेक नागरिक व प्रवाशांनी आपल्या मोबाईलमध्ये टिपले. सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः रात्रीच्या वेळी अस्वलींचा मुक्त संचार दिसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही अस्वल काही काळ परिसरात फिरत होती. बसस्थानकाजवळील दुकाने, हॉटेल परिसर आणि प्रतीक्षालयाच्या भागाजवळही ती दिसल्याने प्रवाशांनी घाबरून सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. काही सतर्क नागरिकांनी मोठ्या आवाजात आरडाओरडा करत अस्वली पळवून लावली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला.



अलीकडच्या काळात मेळघाट जंगल परिसरात अस्वलींची संख्या वाढलेली आहे. जंगलातून बाहेर येऊन वस्तीच्या भागात प्रवेश करण्याच्या घटना सतत घडत आहेत. काही ठिकाणी अस्वलींच्या हल्ल्यांमध्ये नागरिक जखमी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बसस्थानकासारख्या गर्दीच्या भागात अस्वली दिसणे ही अत्यंत चिंताजनक बाब असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच वनविभागाला कळविण्यात आले असून अस्वली कोणत्या दिशेने गेली याचा शोध सुरू आहे. बसस्थानक परिसर आणि आसपासच्या भागात वनविभागाच्या पथकाने गस्त वाढवली आहे. नागरिकांनी रात्री अनावश्यक वावर टाळावा व अस्वल दिसल्यास तत्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी नगरसेवकांसाठी रणधुमाळी ठरतेय प्रतिष्ठेची!
## नगरपालिका निवडणूक : प्रत्येक प्रभागात आजमावताहेत नशीब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

नगरपालिका निवडणुकीचा आखाडा तापू लागला असून, या आखाड्यात अनेक माजी नगरसेवकांनी पुन्हा उडी घेतली असून, पालिकेच्या सभागृहात पोहोचण्यासाठी मागच्या काही दिवसांपासून जनतेच्या दरबारात ही मंडळी आपले अजमावत आहेत.



नगरपालिकेच्या सभागृहातून राजकारणात प्रवेश करीत या क्षेत्रात आपले प्रस्थ मजबूत करण्याची प्रत्येकाची इच्छा असते. शहराच्या विकासात हातभार लावण्याच्या उद्देशाने काही नव्या दमाच्या तरुणांनीही या निवडणुकीत उडी घेतली आहे. त्यामुळे अनेक प्रभागांमध्ये माजी नगरसेवकांसमोर नव्या चेहऱ्यांनी आव्हान उभे केले आहे. काही ठिकाणी तर पक्षाने तिकीट नाकारल्याने अनेकांनी दुसऱ्या पक्षात उडी घेऊन रिंगणात उभे राहिले आहेत.

नगरपालिकेच्या निवडणुकीत पूर्वीचा अनुभव माजी नगरसेवकांच्या गाठीला असल्याने अशा उमेदवारांनी प्रचाराचे नियोजन करून काम सुरू केले आहेआपल्या प्रभागातील मतदारांचीयादी तयार करणे, प्रत्येक मतदाराशी किमान फोनद्वारे तरी संपर्क साधता यावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. प्रभागात यापूर्वी काम केले असल्याने मतदार कसे आहेत, कोणाच्या बाजूने आहेत, कुठे आपल्याला जोर लावावा लागणार, याचे गणित या उमेदवारांना जमलेले असते.याउलट नगरपालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच उतरलेल्या उमेदवारांना सर्वच तयारी सुरुवातीपासून करावी लागत आहे, अशाही परिस्थितीत प्रभागाचा अभ्यास करून ही मंडळी जनतेसमोर जात आहेत. या निवडणुकीत किती माजी नगरसेवकांना जनता स्वीकारते आणि किती नव्या उमेदवारांना संधी देते, हे मात्र ३ डिसेंबर रोजीच स्पष्ट होणार आहे.

**माजी नगरसेवकांची कसोटी**

या निवडणुकीत अनेक माजी नगरसवेकांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. आरक्षणामुळे काही नगरसेवकांची संधी हुकली असली तरी त्यांनी त्यांच्या नातेवाईकांना निवडणुक रिंगणात उभे केले असून, त्यांना विजयी करण्यासाठी धडपड करताना दिसून येत आहेत.

# अमरावतीत दहशतवाद विरोधी मॉकड्रिल यशस्वी
## जलद प्रतिसाद पथकाने चपळाईने अतिरेकी ठेचले, ओलीसांची सुटका




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

आगामी निवडणुका, व्ही.व्ही.आय.पी. व्यक्तींची सुरक्षा आणि शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आज दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी शासकीय विश्राम भवन, अमरावती येथे दहशतवाद विरोधी मॉकड्रिल यशस्वीरीत्या पार पडली. सकाळी १२.३० ते १.४५ वाजेपर्यंत मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांच्या आदेशानुसार जलद प्रतिसाद पथक (टढ) अमरावतीतर्फे ही मॉकड्रिल आयोजित करण्यात आली होती.कार्यवाहीदरम्यान जलद प्रतिसाद पथकाचे प्रमुख पोउपनि अजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कंमांडो पथकाने अत्यंत कुशलतेने कारवाई करत कोणतीही मनुष्यहानी न होता २ अतिरेकींना जेरबंद केले. तसेच त्यांनी ओलीस ठेवलेल्या ३ व्हीआयपींची यशस्वी सुटका करण्यात आली. पथकाने दाखवलेल्या तत्परतेचे आणि समन्वयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.या मॉकड्रिलमध्ये टढ चे अधिकारी व कमांडो, डॉग स्कॉड, बी.डी.डी.एस.चे पोनि. रवि जेधे, पोउपनि नरवणे व त्यांचे स्टाफ, एटीबीचे पोउपनि सोनोने व पथक, स्थानिक पोलीस स्टेशनचे प्रभारी पोनि. रोशन सिरसाट व कर्मचारी तसेच विश्राम भवनचे प्रभारी श्रीकृष्ण गोमकाळे व त्यांचा स्टाफ यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.संपूर्ण मॉकड्रिल पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ गणेश शिंदे, परिमंडळ-२ श्याम घुगे, उपआयुक्त मुख्यालय रमेश धुमाळ आणि सहायक पोलीस आयुक्त फ्रेजरपुरा कैलास पुंढकर यांच्या निर्देशनानुसार संयुक्तपणे यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली.

# ॲपवर पिकांचा फोटो अपलोड करा 'एआय' सांगेल रोग कोणता?
## 'महाविस्तार एआय' शेतकऱ्यांचा डिजिटल साथी मराठीतही माहिती विचारण्याची सुविधा उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महाविस्तार एआय' हे ॲप सध्या शेतकऱ्यांसाठी नवा डिजिटल सोबती ठरतआहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेले हे ॲप शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणींवर तत्काळ उपाय सुचवते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा उद्देश यामागे आहे. त्यामुळे शेतकरी एखाद्या प्रश्नाचे उत्तर, पीक सल्ला किंवा माहिती आता एका क्लिकवर मिळवू शकतो.



'महाविस्तार एआय' हे ॲप राज्यातील शेती क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत असून, कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी या हेतूने राज्य शासनाने ते विकसित केले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. चॅटबॉटमार्फत शेतकरी विविध शेतीविषयक प्रश्न विचारून तत्काळ मार्गदर्शन घेत आहेत. तसेच बाजारभावासह इतर आवश्यक माहितीही या ॲपतर सहज उपलब्ध होत आहे.'महाविस्तार एआय' हे महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेले आधुनिक ॲप असून, ते शेतकऱ्यांना शेतीसंबंधित सर्वसमावेशक माहिती उपलब्ध करून देते. शेतकऱ्यांसाठी या ॲपचा वापर अत्यंत सोपा आहे.

**कसा करायचा वापर?**

शेतकरी गुगल प्ले स्टोअरवर जाऊन हे ॲप डाउनलोड करू शकतो. डाउनलोड झाल्यानंतर साध्या लॉगिन प्रक्रियेद्वारे खाते तयार करावे लागते. लॉगिन पूर्ण झाल्यानंतर शेतकरी आपल्या पिकांचे फोटो अपलोड करू शकतो, हवामानाचा अंदाज पाहू शकतो, तसेच खत व पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन मिळवू शकतो. याशिवाय कीड व रोगनियंत्रणाबाबत त्वरित उपाययोजना देखील उपलब्ध आहेत. प्रगत एआय चॅटबॉटमुळे शेतकरी प्रश्नांची उत्तरे मराठीत सहज मिळवू शकतो. त्यामुळे शेतकरी पिकांसाठी योग्य निर्णय योग्य वेळी घेऊ शकतो.

# शेतमजूर गुंतला निवडणुकीत; कापूस वेचणी,रब्बी ची कामे थांबली; वाहनचालकांनाही मिळाला तात्पुरता रोजगार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ धारणी**

नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर प्रचाराला मोठी गती मिळाली असून, या प्रचारमोहिमेला गर्दी करण्यासाठी गावखेड्यातील मजुरांची मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. काही मजूर थेट प्रचारात दाखल होत असून, याचा




परिणाम शेतशिवारातील कापूस वेचणी, रब्बी पेरणी आणि भाजीपाला काढणीसारख्या तातडीच्या कामांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. मजूर उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी अडचणीत सापडले आहेत.ग्रामीण भागात शेतीकामासाठी मजूर मिळणे आधीच अवघड झाले होते. आता निवडणूक प्रचारामुळे मजूरवर्ग निवडणूक प्रचारात ओढला जात आहे. कारणही तसेच ठोस शेतातील मेहनतीच्या कामाच्या तुलनेत शहरातील प्रचारासाठी मिळणारी मजुरी समान, कधीकधी अधिकच. त्यात चहा, नाश्ता, जेवणाची मोफत सोय, दिवसाचे चांगले पैसे आणि मेहनतीची फारशी गरज नसल्याने मजूर शहराच्या दिशेने आकर्षित होत आहेत.उमेदवार स्वतः मजूर आणण्यासाठी गाड्या पाठवत आहेत. स्थानिक कार्यकर्त्यांकडे या व्यवस्थेची जबाबदारी दिली असून, दुर्गम भागातील गावांमधूनही मोठ्या प्रमाणात मजूर आणले जात आहेत.

# 'स्पर्श'मध्ये वेतन अडकले अन् कर्मचाऱ्यांचे आरोग्य बिघडलेराष्ट्रीय आरोग्य अभियान
## ऑक्टोबरचा पगारही अद्याप मिळालेला नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

केंद्र सरकारच्या धर्तीवर राबविण्यात आलेल्या 'स्पर्श' या ऑनलाइन वेतन प्रणालीत अडथळे निर्माण होत असल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन अडकले आहे. दिवाळीत प्रणाली सुरू करण्यात आली. त्यामुळे सणासुदीच्या काळात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या घरात अंधार होता. आता नोव्हेंबर महिना संपण्याच्या मार्गावर असताना ऑक्टोबर महिन्याचे वेतन मिळाले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांत नाराजीचा सूर आहे.

एनएचएम अभियानांतर्गत जिल्ह्यात शेकडो कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांचे वेतन यापूर्वी पीएफएम प्रणालीमार्फत करण्यात येत होते; परंतु त्यानंतर शासनाने ई-स्पर्श प्रणाली सुरू केली. या प्रणालीत अडथळे येत आहेत. या प्रणालीची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. दिवाळीत कर्मचाऱ्यांना वेतन मिळाले नाही.

कर्मचाऱ्यांनी संप केल्याने सप्टेंबर महिन्यात १५ दिवसांचेच वेतन मिळाले. ऑक्टोबर महिन्याचे वेतन अजूनही झाले नाही. सर्व कर्मचारी कंत्राटी आहेत. किराणा, घरभाडे, मुलांचे शिक्षण, आई-वडिलांचे आजारपण, दैनंदिन प्रवासासाठी लागणाऱ्या पैशांची जुळवाजुळव आरोग्य करताना विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

**किती मिळते दरमहा वेतन ?**

राष्ट्रीय आरोग्य अभियानात कर्मचाऱ्यांना मागील १० ते २२ वर्षापासून कंत्राटी म्हणून



कर्तव्य बजावावे लागत आहे. विविध पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना १८ ते ६० हजार रुपये दरमहा वेतन मिळते. मात्र, ते नियमित अदा होत नसल्याने आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना बारमाही आर्थिक तंगीचा सामना करावा लागत आहे.

# फास्टॅगनसला तर रोखीत दुप्पट, डिजिटल पेमेंटमध्ये सव्वापट भुर्दंड
## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाचा नवा नियम १५ नोव्हेंबरपासून लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयानेफास्टेंगबाबत नवीन नियम जारी केले आता टोल शुल्काच्या दुप्पट नाही तर १.२५ पट असेल आणि युपीआय वापरूनही शुल्क भरता येईल. हा नियम १५ नोव्हेंबरपासून देशात लागू झाला आहे. वाहन धारकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आहेत. फास्टॅग शिवाय, टोल शुल्क केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सर्वसामान्यांना मोठा दिलासा दिला. आता वाहनांमध्ये फास्टॅग नसल्यास त्यांना दुप्पट टोल शुल्क भरावे लागणार नाहीत. आता जर चालकाचा फास्टंग सुरू नसेल तर तो यूपीआयद्वारे टोल भरू शकतो. यादरम्यान त्याला टोल शुल्काच्या १.२५ पट रक्कम भरावी लागेल. वाहनधारकांना यामुळे भुर्दंड कमी बसणार आहे.

**....तर तुम्हाला दुप्पट शुल्क भरावे लागेल**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने रोख पेमेंट रोखण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. २०२२ पर्यंत, फास्टॅग




पेनेट्रेशन अंदाजे ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचेल, यामुळे टोल बूथवरील सरासरी प्रतीक्षा वेळ ४७ सेकंदांपर्यंत कमी होईल. सध्या, जर एखाद्या वाहनात फास्टॅग नसेल किंवा पुरेसा बॅलन्स नसेल, तर त्याला दुप्पट शुल्क भरावे लागते. नवीन नियम लागू झाल्यामुळे, दंड आता रकमेच्या सव्वा पट भरावा लागणार आहे.नवीन नियमानुसार, जेव्हा आपली फास्टॅग शिल्लक कमी असते, तेव्हा आपण यूपीआय वापरून पेमेंट करू शकतो.

**टोल शुल्क प्रत्यक्ष रकमेच्या १.२५ पट असेल**

केंद्रीय मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, नवीन नियम लागू झाल्यानंतर, जर फास्टॅगमध्ये शिल्लक नसेल, तर यूपीआयद्वारे पेमेंट करणाऱ्या वाहनाकडून टोल कराच्या १.२५ पट दंड आकारले जाईल. टोल प्लाझा ओलांडताना इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन सिस्टममध्ये बिघाड झाल्यामुळे पेमेंट अयशस्वी झाल्यास, कोणताही टोल शुल्क आकारला जाणार नाही आणि वाहनाला टोल विनामूल्य ओलांडण्याची परवानगी दिली जाईल.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत